नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३१ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026


दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### चाकणकरांच्या बहिणीला नोटीस



अहिल्यानगर (स. गांवकरी) : शिर्डी पोलिसांनी भोंदू अशोक खरात प्रकरणाशी संबंधित असलेल्या समता पतसंस्थेतील संशयास्पद आर्थिक व्यवहाराप्रकरणी राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या भगिणी प्रतिभा चाकणकर यांना नोटीस बजावली आहे. यामुळे पोलिसांनी रुपाली चाकणकर यांच्या चौकशीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणात दररोज नवनवे खुलासे होत आहेत. या प्रकरणी खरातविरोधात शिर्डीत बेकायदा सावकारी व आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येथील समता पतसंस्थेत त्याच्याशी संबंधित अनेक संशयास्पद खाते आढळलेत. यात प्रतिभा चाकणकर व त्यांच्या मुलांच्या नावे असणाऱ्या 4 खात्यांचाही समावेश आहे. या खात्यांवरून तब्बल 2 कोटी 40 लाख रुपयांचा व्यवहार झाल्याची बाब पोलिस तपासात निष्पन्न झाली आहे. या आर्थिक व्यवहाराचा सावकारी व्यवसायाशी काही संबंध आहे का? तसेच हे पैसे कुणाचे आहेत? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पोलिसांनी प्रतिभा चाकणकर यांना नोटीस बजावली आहे.

# लाडकी बहीण योजना बंद करा

## न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले; पेन्शनला पैसे नाहीत, पण योजनेसाठी कोट्यवधी?




मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संदर्भात मोठी घडामोड समोर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या योजनेवरून राज्य सरकारला तीव्र शब्दांत सुनावले आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन व इतर लाभ देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यास ही योजना बंद करण्याचा विचार करा, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. या टिप्पणीमुळे राज्याच्या आर्थिक धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही सुनावणी एका निवृत्त महिलेच्या याचिकेवर झाली. मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या या महिलेने सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारे निवृत्तीवेतन आणि इतर लाभ न मिळाल्यामुळे न्यायालयात धाव घेतली होती. यावर पालिकेच्या वकिलांनी कोर्टात मांडले की, या लाभांसाठी आवश्यक निधी उपलब्ध नाही, कारण राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळत नाही. यावर न्यायालयाने कठोर शब्दांत प्रतिक्रिया देत सरकारच्या प्राधान्यक्रमांवर सवाल उपस्थित केला.

न्यायालयाने विचारले की, लाडकी बहीण योजनेसाठी 40 हजार कोटी रुपये खर्च करता, मग पेन्शनसाठी पैसे कसे नाहीत? सरकारच्या या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा परिस्थितीत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे. जर निधीची कमतरता असेल, तर अशा मोठ्या योजनांचा पुनर्विचार करावा, असेही न्यायालयाने सूचित केले. या वक्तव्यामुळे राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडत असल्याचेही समोर आले आहे.

या योजनेअंतर्गत सुमारे 2 कोटी 43 लाख महिलांनी नोंदणी केली होती. प्रत्येक लाभार्थी महिलेला दरमहा 1,500 रुपये दिले जात असल्याने वार्षिक खर्च सुमारे 43,740 कोटी रुपयांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे राज्याच्या आर्थिक संतुलनावर या योजनेचा परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. योजनेतील पारदर्शकतेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### सरकार काय भूमिका घेणार, याकडे लक्ष

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने लाभार्थ्यांची सखोल पडताळणी सुरू केली आहे. पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम महिलांनाही योजनेचा लाभ मिळत असल्याचे आढळल्याने केवायसी मोहीम राबवण्यात आली. त्यामुळे मोठ्या संख्येने लाभार्थी कमी झाले आहेत. मात्र, न्यायालयाच्या निरीक्षणानंतर आता या योजनेबाबत सरकार काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### वर्षाला ४३,७४० कोटी रुपयांचा बोजा

राज्यात विधानसभा निवडणुकीपासून सुरू झालेल्या 'लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थी महिलांच्या ई-केवायसी प्रक्रियेत 71 लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. या महिलांनी ई-केवायसी केले नसल्याने त्या या योजनेत बसत नव्हत्या हे स्पष्ट झाले आहे. या योजनेत 2 कोटी 43 लाख महिलांनी नोंदणी केली होती आणि त्यांना दरमहा 1,500 रुपये मदत मिळत होती. त्यामुळे सरकारी तिजोरीवर वर्षाला 43,740 कोटी रुपयांचा बोजा येत होता. या लाडकी बहीण योजनेचा फटका काही प्रमाणात इतर योजनांना देखील बसला होता, राज्याची आर्थिक घडी या योजनेमुळे काहीशी विस्कटल्याने अपात्र महिला शोधण्याची मोहीम महिला व बालकल्याण विभागाने राबवली होती. अनेत शासकीय कर्मचारी, महिलांच्या नावे काही पुरूष देखील या योजनेचा लाभ घेत असल्याचे समोर आले होते. योजनेच्या अटी पूर्ण न करणाऱ्या किंवा श्रीमंत घरातील महिलाही या योजनेचा लाभ घेत असल्याने सरकारने लाभार्थी खातेदारांचे केवायसी करण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे आता 71 लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत.

# संतोष देशमुखांच्या हत्येची तक्रार मागे घ्या : आरोपींचा प्रस्ताव


## जेलमधून बाहेर आलेल्या दादासाहेब खिंडकरांचा दावा

बीड : (स. गांवकरी)



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांचे साडू दादासाहेब खिंडकर हे तब्बल 13 महिन्यांच्या कारावासानंतर अखेर तुरुंगाबाहेर आले आहेत. एका तरुणाला अमानुष मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याप्रकरणी पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला होता, ज्यासाठी त्यांना वर्षभरापेक्षा जास्त काळ तुरुंगात राहावे लागले. कारागृहातून सुटका झाल्यानंतर समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी, पुष्पगुच्छ आणि ओवाळणी करत खिंडकर यांचे जंगी स्वागत केले. तुरुंगातून बाहेर आल्यावर एका वृत्तवाहिनीशी बोलताना खिंडकर यांनी खळबळजनक दावा केला आहे. आपल्याला एका जुन्या व्हिडिओच्या आधारे खोट्या प्रकरणात जाणीवपूर्वक फसवण्यात आले असून, संतोष देशमुख हत्या प्रकरणाची तक्रार मागे घेण्यासाठी आपल्यावर दबाव टाकण्यात आला होता, असे त्यांनी सांगितले. ही तक्रार मागे घेण्याच्या बदल्यात सुटकेचा प्रस्ताव धनंजय देशमुखांसमोर ठेवण्यात आला होता, असा गंभीर आरोपही खिंडकर यांनी यावेळी केला. दादासाहेब खिंडकर म्हणाले, मला फसवण्यात आलेला हा जुना व्हिडिओ आहे. हे सगळे लोक पैसे घेतात, नशा करतात आणि खोटे गुन्हे दाखल करतात. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली, ते प्रकरण दाबण्यासाठी या प्रकरणाचा वापर करण्यात आला. याच लोकांनी गावातल्या अनेक लोकांवर असे खोटे गुन्हे दाखल केले आहेत. याच आरोपींनी अनेक लोकांना मारहाण केली. परंतु, त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल करण्यात येत नाही. पुढे बोलताना दादासाहेब खिंडकर म्हणाले, आपल्यावर जुन्या व्हिडिओच्या माध्यमातून खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. आणि तुरुंगात टाकण्यात आले. आपण तुरुंगात असताना आपल्यावर ज्यांनी खोटा गुन्हा दाखल केला त्यांनी धनंजय देशमुख यांना एक प्रस्ताव दिला. दादासाहेब खिंडकरला सोडवायचे असेल तर संतोष देशमुख हत्या प्रकरणाची तक्रार मागे घ्या असा प्रस्ताव धनंजय देशमुख यांना देण्यात आला होता. तसेच आपल्यावर ज्यांनी खोटा गुन्हा दाखल केला त्यांच्यामागे मोठी राजकीय शक्ती असल्याचा दावाही दादासाहेब खिंडकर यांनी केला आहे. तसेच या सर्वांनी गावातील अनेक लोकांना मारहाण केली आहे. त्याचे अनेक व्हिडिओ आपण पोलिसांना दिले असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेंडी या विद्यालयाचे प्राचार्य
श्री. दिलीप निवृत्ती रोंगटे सर
हे नियत वयोमानानुसार प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत.
त्यानिमित्त आयोजित..
सेवापूर्ती गौरव सोहळा
व भावी वाटचालीस...



हार्दिक शुभेच्छा



-: शुभेच्छूक :-
शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ रोजी स. ९.३० वाजता, ठिकाण : माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेंडी


श्री. संपतराव पांडुरंग मालुंजकर
शिक्षणाधिकारी, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले


श्री. सुनिल एकनाथ मालुंजकर
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, शेंडी
सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी


श्री. राजेंद्र तुकाराम सोनवणे
मुख्याध्यापक, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, मेहेंदुरी


श्री. सुनिल दत्तात्रय जाधव
सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक
माध्य व उच्च माध्य. विद्यालय, शेंडी


श्री. महेश विष्णू पाडेकर
विभागीय कार्याध्यक्ष: शिक्षक भारती पुणे विभाग
विशेष संपर्क प्रमुख: माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ
तालुकाध्यक्ष: राष्ट्र सेवा दल, अकोले
राज्य प्रसिध्दी प्रमुख: निसर्ग व सामा. पर्यावरण मंडळ


श्री. डॉ. नितीन तुळशीराम आरोटे
प्राध्यापक,
अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. रविंद्र बाबुराव गायकवाड
प्राध्यापक,
अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. रामदास पोपट मुर्तडक
चेअरमन : अ.ता.ए.सोसा. कर्मचारी पतसंस्था
प्राध्यापक, अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. किरण परशराम चौधरी
माध्यमिक विद्यालय, चिंचावणे,
प्रतिनिधी : एल.आय.सी.


श्री. कामराज विठ्ठलराव जाधव
प्राध्यापक,
अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. सुनिल गंगाधर टिक्कल
प्राध्यापक,
अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. किरण श्रीराम इंगळे
उपप्राचार्य, दादासाहेब रुपवते कॉलेज, अहिल्यानगर


श्री. शिवाजी काशिनाथ बुरके
प्राध्यापक,
अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. दिपक बबन वाकचौरे
प्राध्यापक,
अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. नरेश पांडुरंग खाडगीर
प्राध्यापक,
अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. आनंद रमेश चौधरी
प्राध्यापक,
अगस्ति कनिष्ठ महाविद्यालय, अकोले


श्री. गंगाधर लोंढे
-प्राथमिक शिक्षक-
जि.प. प्राथ. शाळा, भाळवणी


श्री. रविंद्र गणपत वारंग
संचालक,
पंकज ऑफसेट, अकोले


श्री. राजेश सिंगळा राठोड
प्रोप्रा. हॉटेल अमृतेश्वर,
शेंडी-भंडारदरा



# शिक्षण क्षेत्रातील उपक्रमशील प्राचार्य दिलीपराव रोंगटे

**शब्दांकन : प्राध्यापक नरेश पांडुरंग खाडगीर**
अगस्ती महाविद्यालय अकोले
**संकलन डॉ. विश्वासराव आरोटे**
राज्य सरचिटणीस मराठी पत्रकार संघ मुंबई.

(समर्थ गांवकरी)

आदरणीय दिलीप निवृत्ती रोंगटे हे प्रदीर्घ सेवेनंतर शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात ३५ वर्षे सेवा करून ३१/०५/२०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत सर्वांच्या वतीने त्यांच्या या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याला प्रथम सलाम करतो. रोंगटे सरांचा जन्म साम्रद येथे झाला अकोले येथील प्राथमिक शिक्षण घाटघर सारख्या अतिदुर्गम भागातील आश्रम शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण आश्रम शाळा खीरविरे तर महाविद्यालयीन शिक्षण संगमनेर येथे झाले बि. एड. व एम.एड.चे शिक्षण शिक्षणशास्त्र महाविद्यालय संगमनेर येथे झाले सर्व परीक्षांमध्ये ते फर्स्ट क्लास विथ डिस्टिंक्शनने पास झाले. रोंगटे सर हे दिनांक १९ मे १९९१ साली अमलेश्वर विद्यालय आंभोळ या ठिकाणी उपशिक्षक म्हणून हजर झाले त्या ठिकाणी सलग १० वर्षे प्रामाणिकपणे सेवा केल्यानंतर स्वर्गीय लोकनेते अशोकराव भांगरे साहेब यांच्या प्रयत्नातून त्यांची शेंडी येथे बदली झाली. त्यानंतर ०१/०१/२००६ रोजी त्यांची प्राचार्य पदी बढती झाली व शेंडी विद्यालयाच्या शैक्षणिक रोपट्याचे हळूहळू वटवृक्षात रूपांतर व्हायला लागले. तसेच विद्यालयाचा सर्वांगीण विकास व्हायला सुरुवात झाली. रोंगटे सर हे शेंडी परिसरातील असल्यामुळे त्यांना परिसराची सर्व कल्पना होती आणि म्हणूनच सर्वांना एकत्र करून लोक सहभागातून त्यांनी संस्थेच्या माध्यमातून पाच वर्ग खोल्या बांधल्या त्यांच्या अंगी कार्य कुशलता असल्यामुळे पुढे त्यांनी अनेक दानशूर व्यक्ती शोधून विद्यालयाचा भौतिक विकास करता येईल यासाठी त्यांनी चंग बांधला त्याचाच एक भाग म्हणून श्री.राजेश कुमार डड्डा यांची यांच्या माध्यमातून ओळख झाली त्यांचे सहकार्य घेऊन शिक्षक पालक माजी विद्यार्थी परिसरातील दानशूर व्यक्तिमत्व यांच्या सहकार्याने तीन अद्यावत प्रयोगशाळा बांधल्या.

पूर्वी कॉलेज भंडारदरा कॉलनीत भरायचे त्यामुळे विद्यार्थ्यांची जाण्या येण्याची गैरसोय व्हायची तेव्हा कॉलेज शेंडी येते सकाळ सत्रात भरून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर केली. हा सर्वांच्या दृष्टीने आनंदाचा क्षण होता. शेंडी येथे प्रयोगशाळा बांधल्यामुळे प्रॅक्टिकलची सोय देखील झाली त्या प्रयोगशाळेचे उद्घाटन माजी मंत्री स्वर्गीय मधुकरराव पिचड साहेब यांच्या हस्ते दिनांक २५ जुलै २०२४ रोजी झाले. सरांचे लोक सहभागातील हे काम पाहून पिचड साहेबांनी पाठीवरती शाबासकीची थाप दिली. ही शाबासकीची थाप पाहून सरांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यांचे सार्थक झाल्याचा आनंद आजही त्यांच्या चेहऱ्यावर वरती दिसत आहे.

शाळा हा त्यांचा श्वास आहे तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा त्यांचा ध्यास आहे शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना त्यांनी विद्यालयामध्ये नवनिर्मिती करण्याचा प्रयत्न कायम केला. वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम केले.विद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षांचे व्याख्यान आयोजित करून शालेय दशेतच स्पर्धा परीक्षांचे बाळकडू विद्यार्थ्यांना मिळाले. या सर्व कामात ते प्रयत्नशील असायचे.

त्याच्या कालखंडामध्ये या विद्यालयाचा जो कायापालट झालेला दिसून येत आहे तो वाखाण्याजोग आहे त्यांचे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कार्य करताना दिसत आहेत, ही अभिमानाची बाब आहे सरांच्या या विविध कामाची पावती म्हणून त्यांना सण २००८-०९ साली मध्ये इबटा संघटनेच्या महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने आदर्श मुख्याध्यापक हा पुरस्कार मिळाला तसेच 2022-23 साली महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार मिळाला.आणि सन 2023 -24 साली जिल्हा मुख्याध्यापक संघाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार मिळाला याबद्दल सर्वांचे खूप खूप अभिनंदन.

विद्यालयांमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ चार भिंतीच्या आतील शिक्षणावर भर न देता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून अनेक उपक्रम राबविले यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक सहल, क्रीडा स्पर्धा, वाढदिवस साजरे करणे, आनंद मेळावा, व्याख्याने आयोजित करणे,वनभोजन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने गरजू व गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेणे त्यांना यथा शक्ती मदतीचा हात देऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले.

असे हे कल्पक नेतृत्व उपक्रमशील प्राचार्य नियत वयोमानानुसार ३१/०५/२०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहे. प्रथमता पुन्हा एकदा त्यांच्या या महान कार्याला सलाम करतो निवृत्तीनंतरच्या काळात समाजाची सेवा करण्यासाठी परमेश्वर त्यांना निरोगी उदंड आयुष्य देवो अशी प्रार्थना करून त्यांच्या भावी वाटचालीस साठी खूप खूप शुभेच्छा.

# पुस्तकांचा भव्य आदान-प्रदान मेळावा





## मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात उद्घाटन!

डोंबिवली : (स. गांवकरी)

डोंबिवलीतील सी. पी. गोएंका इंटरनॅशनल स्कूलमध्ये भव्य पुस्तक आदान-प्रदान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्याचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. सुमारे ६ लाख पुस्तकांचा समावेश असलेल्या या उपक्रमामुळे वाचन संस्कृतीला चालना मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या मेळाव्याचे उद्घाटन शिक्षण महार्षी श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास मुख्य उद्घाटक म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री. योगेश सोमाण, कोषाध्यक्ष श्री. प्रदीप निफाडकर, प्रमुख कार्यवाह सौ. स्वाती महाळंक, कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर सौ. हर्षाली चौधरी, डोंबिवलीचे आमदार तथा भाजप प्रदेशाध्यक्ष श्री. रवींद्र चव्हाण, उपमहापौर श्री. राहुल दामले, कल्याण ग्रामीणचे आमदार श्री. राजेश मोरे, महानगरपालिका आयुक्त श्री. अभिनव गोयल, दिनेशभाई कोटक, चिमनभाई ठक्कर जलारामवाला आणि देवजी दामजी ठक्कर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक, कर्मचारी तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. सभागृह पूर्णपणे भरून गेले होते. यावेळी नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या भाषणात वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत, “शिक्षण आणि वाचन अत्यंत आवश्यक आहे. या मेळाव्याचा सर्वांनी सदुपयोग करावा. घर मंदिरासारखे बनवा आणि व्यसनांपासून दूर रहा,” असे आवाहन केले. या उपक्रमामुळे लाखो लोकांना वाचनाची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रविंद्र जोगळेकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, “हा पुस्तक मेळावा अत्यंत गरजेचा आहे. माझ्याकडून काही मदत लागली तर जरूर सांगा. दररोज हजारो लोक येथे येऊन या मेळाव्याचा लाभ घेतील,” असे सांगितले. महापौर सौ. हर्षाली चौधरी यांनी नानजीभाई ठक्कर यांचे आभार मानत हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे नमूद केले.

या मेळाव्याला विविध शाळांमधील विद्यार्थी तसेच समाजातील अनेक नागरिक उपस्थित राहणार असून किमान एक लाख लोक या उपक्रमाला भेट देतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी नानजीभाई ठक्कर यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



## 'पिक्चर बॉईज'चा टीझर लॉंच

पुणे : (समर्थ गांवकरी)

उन्हाळ्याच्या सुटीत कॉमेडीचा सुखद अनुभव देणाऱ्या पिक्चर बॉईज या चित्रपटाचा टीझर लॉंच करण्यात आला आहे. १५ मे रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार असून, चित्रपटांमध्ये हिरो होण्यासाठी धडपडणाऱ्या दोन तरूणांची धमाल गोष्ट या चित्रपटात पाहता येणार आहे. त्रिमूर्ती फिल्म्सनं 'पिक्चर बॉईज' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रवी पांडुरंग पंडितपवार, राजा पांडुरंग पंडितपवार हे या चित्रपटाचे निर्माते असून शिवाजी केशव पाटील हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शन निलेशसिंह राजपूत यांनी केलं आहे. मंदार चोळकर, सुनील दोडगे, संध्या-प्रनिकेत यांनी लिहिलेल्या गीतांना वरुण लिखाते आणि संध्या-प्रनिकेत यांनी संगीतबद्ध केले आहे.

# 'सिल्व्हर मोटर्स-निसान'च्या भव्य शोरूमचे उद्घाटन



नवीन शोरूममध्ये अत्याधुनिक वाहनांची श्रेणी उपलब्ध असून, आधुनिक सुविधा व ग्राहक-केंद्रित सेवेमुळे पुणेकरांना उत्कृष्ट अनुभव मिळणार आहे. तसेच सिल्व्हर मोटर्स – निसान लवकरच पुणे शहर व जिल्ह्यात विस्तार करणार असल्याचे सांगण्यात आले.

पुणे : (स. गांवकरी)

दि. ७ एप्रिल २०२६ रोजी, पुण्यातील ऑटोमोबाईल क्षेत्रात १९३५ पासून विश्वासार्ह नाव असलेल्या सिल्व्हर जुबिली ग्रुपअंतर्गत कार्यरत सिल्व्हर मोटर्स – निसान या नव्या अत्याधुनिक शोरूमचे पुणे कॅम्प येथे भव्य उद्घाटन पार पडले. या शोरूमचे उद्घाटन निसान मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सौरभ वत्स यांच्या हस्ते झाले. यावेळी निसान मोटर इंडियाचे डायरेक्टर श्री. अभिषेक अरोरा, श्री. विवेक पल्लिवाल, श्री. राकेश नेगी, श्री. मृन्मय गोगोई तसेच निसानची टीम उपस्थित होती. भारतामध्ये निसानची उपस्थिती १९६५ पासून असून, भारतीय सैन्याने विश्वास ठेवत निसान पॅट्रोल ६० (जोंगा) वाहनाची निवड केली होती. विविध युद्ध मोहिमांमध्ये हे विश्वासार्ह वाहन ठरले असून, निसान हे ब्रँड भारतात विश्वासार्हतेचे प्रतीक आहे. सिल्व्हर जुबिली ग्रुपचा वारसा १९३५ पासून पुणे कॅम्प परिसरात पेट्रोल पंप, कार शोरूम व सर्व्हिस स्टेशनच्या माध्यमातून दृढपणे रुजलेला आहे. सिल्व्हर मोटर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक सौ. राजवर्धिनी संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प साकारण्यात आला आहे. यावेळी मा. आमदार रवींद्र चव्हाण (भाजप प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र), मा. राजेश पांडे (प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र), मा. आमदार संजय जगताप (भाजप प्रदेश सचिव, महाराष्ट्र), श्री. समरादित्य संजय जगताप, श्री. राजेंद्र पाटील, मा. खासदार अशोकअण्णा मोहोळ, मा. आमदार संग्रामदादा थोपटे, मा. आमदार दिलीपराव मोहिते, मा. आमदार रमेशअप्पा थोरात, मा. आमदार अशोकराव पवार, मा. आमदार अतुल बेनके, आमदार सुनील कांबळे, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. वीरधवल जगदाळे, श्री. हरिभाऊ लोळे, श्री. अजय इंगळे, सौ. स्वरूपाताई थोपटे, सौ. सुजाताताई पवार, श्री. तुषार थोरात, सौ. प्राजक्ता दुर्गाडे, डॉ. दिगंबर दुर्गाडे (चेअरमन, पीडीसीसी बँक), उपाध्यक्ष सुनील चांदेरे, माजी अध्यक्ष रमेश थोरात तसेच सर्व संचालक मंडळ, संत सोपानकाका सहकारी बँकेचे चेअरमन व सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी, श्रीमती आनंदीकाकी चंद्रकांत जगताप (नगराध्यक्ष, सासवड नगरपालिका), सनदी अधिकारी डॉ. राजेंद्र चंद्रकांत जगताप (IDES), संरक्षण मंत्रालय – प्रिन्सिपल डायरेक्टर, सदर्न कमांड, सौ. केतकी शिर्के, सौ. नीताताई पाटील (पवार) सौ. गौरवी अतुल भोसले (चेअरमन, जागृती साखर कारखाना), संभाजी ब्रिगेडचे प्रवीणदादा गायकवाड, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी तसेच सिल्व्हर मोटर्सचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेडा समाधीची चार दिवसीय यात्रा रविवारपासून

आळेफाटा : (स. गांवकरी)

संपूर्ण जुन्नर तालुक्यासह शेजारच्या तालुक्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र आळे (ता. जुन्नर) येथील 'वेद बोलविलेल्या रेडा समाधी'च्या चार दिवसीय प्रापंचिक यात्रोत्सवाला रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ पासून मोठ्या उत्साहात प्रारंभ होत आहे. धार्मिक परंपरा जपत प्रापंचिक गरजा भागवणारी यात्रा म्हणून या यात्रेची विशेष ओळख आहे. यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली असून, देवस्थान व यात्रा समिती



सज्ज झाली आहे. ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष अविनाश कुन्हाडे यांनी सांगितले की, "संत ज्ञानेश्वर महाराजांनी आळे येथे रेड्यामुखी वेद बोलविले, अशी आख्यायिका आहे. ज्या रेड्याने वेद उच्चारले, त्याच रेड्याची ही समाधी आहे. त्यामुळे या समाधीला 'वेद बोलविलेल्या रेडा समाधी' असे म्हटले जाते. वारकरी संप्रदायात या समाधीला अनन्यसाधारण महत्त्व असून, यात्रेच्या निमित्ताने राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येतात.

# तरुणाईने जनगणनेत जमात नोंदीबाबत जनजागृती करावी

रावेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील वाघोदा खुर्द येथे आदिवासी कोळी बहुउद्देशीय शिखर संस्था रावेर यांच्या तर्फे विशेष मिटींग चे आयोजन करण्यात आले होते . या प्रसंगी रावेर तालुक्यातील विविध समस्या , संस्थेचा प्रसार व प्रचार करण्यासंदर्भात व सदस्य वाढीसाठी पुढील नियोजन करण्यात आले होते . तालुक्यातील सर्व आदिवासी टोकरे कोळी जमात बांधव यांनी निवडणुक आयोगाशी संबंधित एस आर आय याद्यांबद्दल व पुढील जनगणनेच्या अहवालामध्ये आपण आपली जनगणना नोंद ही टोकरे कोळी म्हणून करावी असा प्रचार व प्रसार आदिवासी



## आदिवासी शिखरचे संस्थेचे आवाहन

कोळी बहुउद्देशीय शिखर संस्था रावेर यांच्या वतीने पुर्ण रावेर तालुक्यात करणार आहेत . असे अध्यक्ष मनोहर कोळी यांनी यांनी सांगितले . त्यावर सर्व संचालकांनी सर्वानुमते ठराव संमत करण्यात आला. वरील जमात उपयोगी विषयावर चर्चा करण्यासाठी विशेष मिटींग चे आयोजन करण्यात आले होते .व संस्थेचे सल्लागार अशोक कोळी यांचे चिरंजीव पुणे येथे आय टी क्षेत्रात उच्च पदावर निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला या प्रसंगी आदिवासी कोळी बहुउद्देशीय शिखर संस्था रावेर यांचे संचालक मंडळ जेष्ठ सभासद श्री संतोष सपकाळे आप्पा सिंगत, श्री हरिलाल भाऊ कोळी कांडवेल , अध्यक्ष मनोहर कोळी सुलवाडी, उपाध्यक्ष विनोद कोळी ( शिवा भाईजी )पुनखेडा , सचिव योगेश्वर कोळी , सुभाष सपकाळे सर सुनोदा , विनोद कोळी नेहता , गोपाळ कोळी खिरवड , विक्की कोळी चोरवड , भुषण तायडे रावेर , ईश्वर कोळी चिनावल , अशोक कोळी वाघोदा खुर्द , सुपडु कोळी थोरगव्हाण , शरद कोळी आंदलवाडी , विजय कोळी अजनाड , सर्व संचालक मंडळ व यांच्या सह वाघोदा खुर्द येथील चुडामण सपकाळे , चिराग कोळी , बाळु कोळी , दिपक कोळी , तुषार कोळी , दिपक तायडे , रवींद्र कोळी , राजेंद्र कोळी , शंकर कोळी , धोंडु कोळी , कैलास सपकाळे सुनोदा , तुळशीराम सपकाळे मस्कावद यांच्या सह समस्त आदिवासी टोकरे कोळी जमात बांधव उपस्थित होते .प्रस्तावना संस्थेचे सचिव योगेश्वर कोळी यांनी केले . आभार प्रमुख सल्लागार विनोद कोळी यांनी मानले.

# शिक्षण क्षेत्रातील 'प्रकाशाचे बेट': आदर्श प्राचार्य दिलीप रोंगटे सर

(समर्थ गांवकरी)

**शिक्षण ही केवळ एक नोकरी नसून ती एक प्रदीर्घ 'साधना' आहे, हे आपल्या ३५ वर्षांच्या अविरत सेवेतून सिद्ध करणारे व्यक्तिमत्व म्हणजे प्राचार्य दिलीप निवृत्ती रोंगटे. नुकतेच ते ३१ मे २०२६ रोजी आपल्या प्रदीर्घ सेवेतून वयोमानानुसार निवृत्त होत आहेत. एका कर्तव्यदक्ष प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली नऊ वर्षे काम करण्याची संधी मला मिळाली, आणि या काळात सरांच्या प्रशासकीय कौशल्याचा आणि सकारात्मक वृत्तीचा जो अनुभव आला, त्याने माझ्या व्यक्तिमत्त्वाला एक नवी दिशा दिली.**



- शब्दांकन : महेश पाडेकर -
अगस्ति कला,वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले जि. अहिल्यानगर.

**संघर्षातून यशाकडे: शैक्षणिक प्रवास** : रोंगटे सरांचा जन्म अतिदुर्गम आदिवासी भागातील साम्रद (अकोले) येथील. त्यांचे प्राथमिक शिक्षण घाटघर सारख्या आदिवासी दुर्गम भागात झाले, तर माध्यमिक शिक्षण खिरविरे येथे पार पडले. पुढे उच्च शिक्षण संगमनेर महाविद्यालयातून पूर्ण करत असताना त्यांनी प्रत्येक परीक्षेत 'प्रथम श्रेणी' आणि 'गुणवत्तेचा' ठसा उमटवला. १९९१ मध्ये अमलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंभोळ (अकोले) येथे उपशिक्षक म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. १० वर्षांच्या निष्ठेच्या सेवेनंतर, स्वर्गीय अशोकराव साहेबांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची बदली शेंडी येथे झाली आणि १ जुलै २००६ पासून त्यांनी 'प्राचार्य' पदाची धुरा सांभाळली.

कायापालट:

शेंडी विद्यालयाचे वटवृक्षात रूपांतर शेंडी विद्यालयाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर रोंगटे सरांनी शाळेचा चेहरामोहरा बदलून टाकला. पूर्वी हे महाविद्यालय भाड्याच्या जागेत (भंडारदरा कॉलनीमध्ये) भरत असे, ज्यामुळे विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत होती. सरांनी आपल्या लोकसंग्रहाच्या जोरावर लोकसहभागातून पाच वर्गखोल्या बांधल्या. राजेशकुमारजी डड्डा यांच्या माध्यमातून मिळालेल्या सहकार्यातून अद्ययावत 'विज्ञान प्रयोगशाळा' उभी केली. या प्रयोगशाळेचे उद्घाटन २५ जुलै २०२४ रोजी माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या हस्ते झाले, तेव्हा सरांच्या कार्याचे कौतुक करताना साहेबांनी त्यांच्या पाठीवर दिलेली शाबासकीची थाप आजही सरांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान देऊन जाते.

**उपक्रमशील नेतृत्व आणि पुरस्कारांची मोहोर**

सरांनी केवळ चार भिंतींतील शिक्षणावर भर न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले. यात प्रामुख्याने: स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन: ग्रामीण भागातील विद्यार्थी अधिकारी व्हावा, यासाठी विशेष मार्गदर्शन वर्ग.

सामाजिक बांधिलकी: गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे. सांस्कृतिक व क्रीडा: विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी क्रीडा स्पर्धा आणि स्नेहसंमेलनांचे नेटके नियोजन.

त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना २००८-०९ मध्ये महात्मा जोतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले 'आदर्श मुख्याध्यापक' पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच २०२२-२३ चा 'आदर्श प्राचार्य' (महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ) आणि २०२३-२४ चा जिल्हास्तरीय 'आदर्श प्राचार्य' पुरस्कार देऊन त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला आहे.

ऋणानुबंधाचा प्रवास

सरांच्या सानिध्यात काम करताना त्यांनी नेहमीच विद्यार्थीहित समोर ठेऊन नवनवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहन दिले. "विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच ध्यास" हे ब्रीद त्यांनी आयुष्यभर जपले. ३१ मे रोजी ते जरी सेवानिवृत्त होत असले, तरी त्यांनी लावलेले हे शैक्षणिक रोपटे आता एका विशाल वटवृक्षाचे रूप धारण करून हजारो विद्यार्थ्यांना सावली देत आहे.

अशा या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाला त्यांच्या पुढील भावी वाटचालीस आणि उत्तम आरोग्यास 'गावकरी' परिवारातर्फे व तमाम विद्यार्थी वर्गातर्फे मनःपूर्वक शुभेच्छा!

# थोडक्यात पण महत्वाचे




## मुंबई-पुणे मार्गावर इलेक्ट्रिक इंटरसिटी बसेसची सेवा सुरू

पुणे (स. गांवकरी) : Switch Mobility या कंपनीने 'प्रसन्न पर्पल मोबिलिटी सोल्युशन्स'च्या सहकार्याने मुंबई-पुणे मार्गावर इलेक्ट्रिक इंटरसिटी बसेसची सेवा सुरू केली आहे. महाराष्ट्राच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत या बसेसना हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या उपक्रमामुळे खासगी क्षेत्रात प्रथमच मोठ्या प्रमाणावर इंटरसिटी इलेक्ट्रिक वाहतूक सुरू होत असल्याचे मानले जात आहे. या सेवेसाठी 'EiV12mt' मॉडेलच्या १० बसेसची पहिली तुकडी रस्त्यावर उतरवण्यात आली असून, एकूण २५ बसेस टप्प्याटप्प्याने सेवेत दाखल केल्या जाणार आहेत. मुंबई-पुणे हा राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा मार्ग असल्याने, या मार्गावर पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देणे महत्त्वाचे ठरणार आहे. या इलेक्ट्रिक बसेसमध्ये ४५ आरामदायी पुशबॅक आसने, आधुनिक सुविधा आणि प्रगत सुरक्षा प्रणाली देण्यात आली आहे. एका चार्जमध्ये ३०० किमीपेक्षा अधिक अंतर पार करण्याची क्षमता तसेच जलद चार्जिंगची सुविधा असल्यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी या बसेस उपयुक्त ठरतात. याशिवाय, रिअल-टाइम देखरेख प्रणालीमुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनतो. या उपक्रमामुळे प्रदूषणमुक्त आणि शाश्वत वाहतुकीला चालना मिळणार असून, भविष्यात इलेक्ट्रिक मोबिलिटीचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. प्रवाशांना आरामदायी, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देण्यावर कंपनीचा भर असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## सगरोळी वाळू घाटावर अंदाज समितीचा सर्जिकल स्ट्राइक



■ अध्यक्ष आ. अर्जुन खोतकर कडाडले; महसूल प्रशासनाचा भोंगळा कारभार उघड

बिलोली (स. गांवकरी) : बिलोली तालुक्यातील सगरोळी वाळू घाटावर महाराष्ट्र विधिमंडळाच्या अंदाज समितीने केलेल्या अचानक धडक दौऱ्यामुळे महसूल प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. या दौऱ्यादरम्यान मोठ्या प्रमाणावर वाळू उपशातील गैरप्रकार उघडकीस येताच समितीचे अध्यक्ष आ. अर्जुन खोतकर यांनी संतप्त प्रतिक्रिया देत संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाईचे आदेश दिले. समितीच्या पाहणीत उपजिल्हाधिकारी क्रांती डोंबे आणि तहसीलदार गजानन शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नियमांना धाब्यावर बसवून यंत्राद्वारे राजरोसपणे वाळू उपसा सुरू असल्याचे स्पष्ट झाल्याने प्रशासनाच्या दाव्यांचा फोलपणा उघड झाला आहे. महाराष्ट्र विधिमंडळाची अंदाज समिती ८ ते १० एप्रिल दरम्यान नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून विविध विभागांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करत.

# काष्टीच्या भैरवनाथ महाराजांचा यात्रा उत्सव

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील ग्रामस्थांचे श्रध्दास्थान असलेल्या ग्रामदैवत भैरवनाथ महाराजांचा यात्रा उत्सव सालाबाद प्रमाणे यंदा होत आहे. आज शुक्रवार दि.10 एप्रिल 2026 ते 11 एप्रिल 2026 पर्यंत सलग दोन दिवस यावर्षी यात्रा उत्सव भरणार असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच साजन सदाशिव पाचपुते व उपसरपंच शितल नितीन ढमे यांनी सांगितले आहे. दरवर्षी हनुमान जयंती नंतर अष्टमीला गावचे ग्रामदैवत भैरवनाथ महाराजांचा तीन दिवस यात्रा उत्सव भरतो पहाटे तीन पासून काकडाआरतीला सुरुवात होते, सहा वाजता अभिषेक,नंतर महाआरती करुण सकाळी सात पासून ते सायंकाळ पर्यत देव दर्शन सुरू होते.यामध्ये वर्षेभर गावासह गावाबाहेर व्यवसाय व नोकरी निमित्त बाहेर गावी असणारे कुटुंब मुळगावी एकत्र येवून नाथमहाराजांना नारळ,पेढे,गुळ, दंडवट घेऊन वर्षभराची नवसस्पूर्ती म्हणून शेरणी वाटप करतात सायंकाळी सात वाजता यात्रेचे सर्वाचे मुख्य आकर्षण म्हणजे देवाचे गाडे ओडणे हा कार्यक्रम होतो. स्व.वामनराव पाचपुते यांच्या वाड्यापासून ते मंदीरापर्यत बाळासाहेब बबन पाचपुते व तुषार शिवराम कोकाटे हे देवबाप्पा तेरा गाडे ओडतात त्यांना सर्व भैरवनाथ भक्त साथ देतात यानंतर शोभेची दारु फटाके उडविले जाते. याचा सर्व यात्रेकरू आनंद घेतात. रात्री अकरा वाजता पाहुण्यासाठी करमणूक म्हणून विठाबाई नारायणगावकर यांचा लोकनाट्य तमाशा पहाटे पर्यंत होतो. दुसऱ्या दिवशी दिवसभर महिलापुरुष लहान मुले यांच्यासाठी मिठाई,खेळणी, सह विविध वस्तुची खरेदी चालु राहते. सायंकाळी चार वाजता राज्याच्या विविध भागातून आलेल्या पहिलवान यांच्यासाठी कुस्तीचा जंगी हगामा भरतो यामध्ये जिंकणाऱ्या मल्लाला ग्रामपंचायत रोख इनाम देते. पुन्हा रात्री करमणूक म्हणून गावकऱ्यासाठी सुरसंगम ऑर्केस्ट्रा सुंदर मराठी, हिंदी गाण्यांची मैफिल भरुण करमणूक केली जाते, तिसऱ्या दिवशी दिवसभर ग्रामस्थ महिला भगिणी सर्वजन खरेदी करुण व पाळण्यामध्ये बसुन आनंद घेतात. अशा पध्दतीने यंदा तीन दिवस यात्रा उत्सव भरणार आहे.

म्हणून यंदा यात्रेला भाविकांची संख्या जास्त असल्याने मोठी गर्दी राहिल यासाठी गावचे रहिवासी जेष्ठ नेते कैलासराव पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनियुक्त सरपंच साजन पाचपुते, सहकार महर्षी संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते उपसरपंच शितल ढमे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत सदस्य व यात्रा कमेटीने संपूर्ण गावात ,मंदीराभोवती व मंदीराच्या कळसावरती विद्युत रोषणाई करुण सुंदर नियोजन करित यात्रेची मोठी तयारी केली आहे. यात्रा सुरळी पार पाडण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी गेली पंधरा दिवसापासून अहोरात्र कष्ट घेत आहे.

# डॉ. अभिजीत कोरडे प्रकरणी अप्रमाणित माहिती पसरवू नका

**अधिकृत चौकशीची प्रतीक्षा करा - आयएमए संगमनेर**

संगमनेर : (समर्थ गांवकरी)

अलीकडे सोशल मीडिया तसेच काही माध्यमांद्वारे आयएमएचे सदस्य डॉक्टर, विशेषतः डॉ. अभिजीत कोरडे यांच्या संदर्भात एकतर्फी, अपूर्ण व पडताळणीविना माहिती प्रसारित केली जात असल्याबद्दल इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) संगमनेरने तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

अशा प्रकारच्या माहितेमुळे संबंधित डॉक्टरांची व्यावसायिक प्रतिमा मलिन होत असून वैद्यकीय क्षेत्रात अनावश्यक भीती, अविश्वास व अस्वस्थता निर्माण होत असल्याचे आयएमएने म्हटले आहे. उपलब्ध माहितीनुसार, फेब्रुवारी 2025 मध्ये रुग्ण दत्तात्रय दळवी यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना सोनांबेकर हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. त्यानंतर कार्डिओलॉजिस्ट डॉ. अभिजीत कोरडे यांनी 28 फेब्रुवारी 2025 रोजी अँजिओग्राफी केली.

त्यामध्ये ब्लॉक आढळल्याने पुढे अँजिओप्लास्टी करण्यात आली. ही प्रक्रिया दुपारी सुमारे 2 वाजता कोणतीही घाईगडबड न करता पार पडल्याचे आयएमएने स्पष्ट केले. मात्र, नातेवाईकांकडून अँजिओप्लास्टी घाईगडबडीत व रात्री करण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून रुग्णास गँगरीन झाल्याचेही सांगण्यात आले; परंतु उपलब्ध माहितीनुसार अशी कोणतीही बाब घडलेली नसल्याचे आयएमएने नमूद केले.

# नांदूर-दसक स्मशानभूमी व विकास कामांचा आढावा

नाशिक (स. गांवकरी)



आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नांदूर-दसक स्मशानभूमी परिसरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणी दरम्यान भाविक व नागरिकांच्या सुरक्षिततेसह मोठ्या प्रमाणातील गर्दी व्यवस्थापनाचा विचार करून नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत स्मशानभूमी क्षेत्राचे रुंदीकरण करण्यात येणार असून, संपूर्ण परिसर अधिक प्रशस्त व सुव्यवस्थित केला जाणार आहे. तसेच, संबंधित प्लॅटफॉर्मचे समतलीकरण करून तो अधिक सक्षम व सुरक्षित करण्यात येईल, ज्यामुळे मोठ्या संख्येने भाविकांना सुलभतेने प्रवेश व वापर करता येईल. परिसरातील पादचारी दळणवळण सुलभ व सुरक्षित व्हावे यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात येणार असून, गर्दीच्या काळातही सुरळीत व्यवस्थापन सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. या पाहणी वेळी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक व पोलीस कर्मचारी, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह आणि अन्य अधिकारी, महापालिका आयुक्त मनीषा खत्री आणि पालिकेच्या संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून निर्धारित वेळेत ही कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. सिंहस्थ कुंभमेळा दरम्यान येणाऱ्या कोट्यवधी भाविकांच्या सोयीसाठी व सुरक्षिततेसाठी ही विकासकामे अत्यंत महत्त्वाची असून, प्रशासनाच्या वतीने सर्व तयारी नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात येत आहे.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांना 'द ग्रेट इंडिया जर्नालिझम आयकॉन अवॉर्ड २०२६' प्रदान!





(स. गांवकरी)



पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांना 'द ग्रेट इंडिया जर्नालिझम आयकॉन अवॉर्ड 2026' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सिनेअभिनेते संतोष पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी मनसेचे राज्य उपाध्यक्ष राजे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला असून ग्रामीण भागातील समस्या, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक घडामोडी आणि जनहिताच्या मुद्द्यांना त्यांनी प्राधान्याने वाचा फोडली आहे. त्यांच्या संपादकीय लेखनातून समाजप्रबोधन, सकारात्मक पत्रकारिता आणि वस्तुनिष्ठ वृत्तांकनाचा ठसा उमटला आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना डॉ. आरोटे यांनी हा सन्मान पत्रकारितेच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा असल्याचे सांगितले. समाजहितासाठी निःपक्षपाती पत्रकारिता करण्याचा संकल्प अधिक दृढ झाल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण झाले असून उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचा गौरव केला.

# सभापतीपदी गंगाराम बेलकर

## तर उपसभापतीपदी संदीप सालके बिनविरोध

**निवडणुका डोळ्यासमोर ठेवून खासदार निलेश लंके यांची मोठी राजकीय खेळी**

■ आगामी निवडणुकांच्या तोंडावर पारनेर बाजार समितीमध्ये मोठी खांदेपालट; गंगाराम बेलकर नवे सभापती



पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडीचा पेच अखेर सुटला असून, सभापतीपदी अनुभवी नेते गंगाराम बेलकर तर उपसभापतीपदी खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे युवा शिलेदार संदीप सालके यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. किसनराव रासकर यांनी सभापतीपदाचा आणि किसनराव सुपेकर यांनी उपसभापतीपदाचा राजीनामा दिल्यानंतर ही रिक्त झालेली पदे भरण्यासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विकास जाधव यांनी कामकाज पाहिले. निवडीनंतर खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर गंगाराम बेलकर यांना बाजार समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवण्याची संधी मिळाली आहे. बेलकर हे तालुक्याचे ज्येष्ठ नेते असून त्यांना प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी पंचायत समितीचे सभापती म्हणून यशस्वीपणे काम पाहिले आहे, तसेच त्यांच्या पत्नी सौ. अरुणा बेलकर यांनीही पंचायत समितीच्या उपसभापती म्हणून जबाबदारी सांभाळलेली आहे. दुसरीकडे, उपसभापतीपदी वर्णी लागलेले संदीप सालके हे निलेश लंके प्रतिष्ठानचे अतिशय जुने आणि विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. एका निष्ठावान युवा कार्यकर्त्याला संधी देऊन खासदार निलेश लंके यांनी तरुणांवर मोठा विश्वास टाकला आहे. या निवडीपूर्वी खासदार निलेश लंके यांच्या कार्यालयात एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत खासदारांनी बेलकर आणि सालके यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आणि त्यानुसार ही निवड बिनविरोध झाली. साधारण तीन वर्षांपूर्वी खासदार लंके यांच्या नेतृत्वाखाली या बाजार समितीवर सत्तांतर झाले होते. सत्तेच्या सुरुवातीला बाबासाहेब तरटे आणि बापू शिर्के यांना संधी मिळाली होती, त्यानंतर किसन रासकर आणि किसन सुपेकर यांनी कार्यभार सांभाळला. आता तिसऱ्या टप्प्यात बेलकर आणि सालके यांच्याकडे ही धुरा सोपवण्यात आली आहे. निवडीची घोषणा होताच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी बाजार समितीच्या परिसरात फटाक्यांची आतिषबाजी करत आणि गुलालाची उधळण करत जल्लोष केला. यावेळी माजी सभापती बाबासाहेब तरटे, किसनराव रासकर, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर डॉ. बाळासाहेब कावरे, नगरसेवक योगीराज गाडे, रा. या. औटी, अशोक कटारिया, पद्मजा पठारे, छाया रोकडे, बाबासाहेब नर्हे, किसन सुपेकर, बापूसाहेब शिर्के, चंदन भळगट, अशोक कटारिया, विजय पवार, आबासाहेब खोडदे, सरपंच प्रकाश गाजरे, राष्ट्रवादीचे प्रवक्ते मोहनराव रोकडे, जितेश सरडे, सचिन पठारे, रवींद्र राजदेव, शहराध्यक्ष संदीप मते, रायभान औटी, शिवाजी बेलकर, उद्योजक संतोष गायखे, बाळासाहेब खिलारी, श्रीरंग रोकडे, रवींद्र गायखे, तुकाराम चव्हाण, संदीप चौधरी, भूषण शेलार, बाळासाहेब दिघे, पंकज बेलकर, चैतन्य बेलकर, ॲड. गणेश कावरे, लखन ठाणगे, गणेश गायखे, रामदास साळवे, प्रमोद गुगळे, शिवाजी भोसले, बाळासाहेब दाते, शांताराम बेलकर, अरुण बेलकर यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते.

# मालमत्ता जप्त करा

पारनेर : (समर्थ गांवकरी)

सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या ठेवीदारांना न्याय देण्यासाठी तातडीने थकीत कर्जदार व अध्यक्ष रामदास भोसले यांच्या सह संचालक मंडळाच्या व नातेवाईक यांच्या मालमत्ता जप्त करा, बँक खाते सील करा अशी मागणी शिवराय सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष विनोद गोळे यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे व आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांकडे कडे केली आहे. पारनेर चे तीन वेळा आमदार व विधानसभा उपाध्यक्ष भूषवलेले विजय भास्कर औटी संस्थापक असलेल्या व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ठाकरे गटाचे रामदास भोसले अध्यक्ष असलेल्या सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या ठेवीदारांना गेल्या दोन वर्षांपासून ठेवी मिळत नसल्याने ठेवीदारांनी न्यायालयात, पोलिस ठाण्यात, आंदोलन व्दारे सगळे दरवाजे ठोठावत आहे. भाजीपाला विक्री करणारे, शेतमजूर यांच्या पासून तर नोकरदारांपर्यत सुमारे 100 ते 150 कोटींच्या ठेवी अडकल्या आहेत. अनेक कर्जदार मोठ्या प्रमाणावर थकीत कर्ज ठेवून व संचालक मंडळ उजळ माथ्याने फिरत आहे.या सर्वांवर कारवाई करावी,त्यांचे व नातेवाईक यांचे बँक खाते सील करावे.

**NAME CHANGE NOTICE**

I, **Devram Babanrao Lohote**, son of **Baban Sakharam Lohote**, residing at AP Rumbhodi, Taluka Akole, District Ahmednagar – 422601, Maharashtra, India, do here by declare that I have changed my name from **Devram Babanrao Lohote** to **Devram Baban Lohote** for all purposes.
Henceforth, I shall be known as **Devram Baban Lohote** in all records and documents.

# किनवट नगरपरिषद, किनवट

**जिल्हा- नांदेड /** नवीन, प्रशासकीय इमारत, किनवट ता. किनवट जि. नांदेड

जा.क्र. पाणी पुरवठा विभाग / ४४५ / २०२६ फोन क्र. (०२४६९-२२२१११) Email : cokinwatgmail.com दिनांक : ०९ / ०४ / २०२६

## निविदा सूचना

किनवट नगरपरिषद मार्फत खालील प्रकारच्या कामासाठी संबंधीत नोंदणीकृत, कंत्राटदार यांचे कडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी सदर कामाकरीता निविदा फॉर्म दिनांक १०/०४/२०२६ ते दिनांक १६/०४/२०२६ इच्छुकांनी दुपारी २.०० वाजे पर्यंत सुटीचे दिवस वगळून उपलब्ध करण्यात येईल. आपल्या कडील सिलबंद निविदा दि. १६/०४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यंत मा. मुख्याधिकारी न.प. किनवट यांचे नावे सादर करावे. प्राप्त निविदा त्याच दिवशी उघडण्यात येईल अथवा प्रशासकीय कारणास्तव नंतर उघडण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचा तपशील | कामाची किंमत | अनामत रक्कम | कोरी फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | हमाल कॉलनी परिसर श्री. शेख माजीदमाजीद यांच्या घराजवळील परिसर | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| २. | S.V.M. कॉलनी परिसर अँड. कोमवार यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| ३. | S.V.M. कॉलनी परिसर गेडाम यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| ४. | राम मंदिर परिसर शबरीमाता मंदिराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| ५. | राम मंदिर परिसर रामा ओट्टीवार यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| ६. | बेल्लोरी परिसर श्री. यादवराव आयनेनीवार यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| ७. | भोजगल्ली परिसर श्री. सुरेश बावणे यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| ८. | अयप्पा स्वामी मंदिर जवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| ९. | सुभाषनगर परिसर श्री. इशरत बागवान यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| १०. | समतानगर परिसर श्री. गणपत मुनेश्वर यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| ११. | धोबीगल्ली परिसर श्री. मार्कण्डेय मंदिरच्या पाठीमागे | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| १२. | साईनगर परिसर श्रीनेहरु वाचनालय जवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| १३. | झाडेनगर परिसर | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| १४. | लोहारगल्ली परिसर सवारी बंगल्याजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| १५. | वेलमापुरा परिसर | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| १६. | मोमीनपुरा परिसर श्री. हुसेनभाई यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| १७. | इस्लामपुरा परिसर श्री. हामिद कुरेशी यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |
| १८. | कंधारवाडी परिसर श्री.रेड्डीवार यांच्या घराजवळ | ११९९५०/- | १०००/- | ५००/- |

**अटी व शर्ती** – १. निविदा द्विलिफाफा पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. २. लिफाफा क्र. १ मध्ये कागदपत्रे व लिफाफा क्र. २ मध्ये दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. ३. लिफाफा क्र. १ मधील आवश्यक ते कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर लिफाफा क्र. २ दरपत्रक उघडण्यात येईल. ४. सदर कामाबाबत सविस्तर निविदा सुचना व अटी शर्ती कार्यालयास पहावयास मिळतील. ५. निविदा स्विकारणे अथवा नाकारणे व प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्याचा अधिकारी या नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद किनवट**

**अध्यक्ष**
**नगरपरिषद किनवट**

# प्रत्येक नागरिकाला न्याय देणे, हीच खरी लोकशाहीची ताकद

पारनेर : (स. गांवकरी)

शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर" पळवे खु. मंडळातील वडनेर हवेली, ता. पारनेर येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले असून, विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना प्रत्यक्ष ठिकाणीच देण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. यावेळी आमदार



काशिनाथ दाते म्हणाले, "महसूल विभाग हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित असून प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी अशा शिबिरांची गरज आहे. तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या बहुतांश समस्या या रस्ते व जमीन विभाजनाशी संबंधित असतात. 'बळीराजा शेतपानंद रस्ते योजना' प्रभावीपणे राबवून या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा शासनाचा प्रयत्न सातत्याने सुरुच आहे. आज राज्य, देश आणि जग झपाट्याने प्रगती करत असताना प्रशासनही तितक्याच वेगाने नागरिकांच्या सेवेत उभे राहिले पाहिजे. शासन व जनतेमधील दरी कमी करून प्रत्येक नागरिकाला न्याय देणे, हीच खरी लोकशाहीची ताकद आहे." यासोबतच त्यांनी ग्रामपंचायतींच्या सक्षमीकरणासोबत नागरिकांच्या होत असलेल्या धावपळीवर व त्यातून त्यांना सामोरे जावे लागत असलेल्या मानस्तापावर उपाय योजना राबविणे गरजेचे असल्याचे सांगताना स्पष्ट केले की, "प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालय सुसज्ज करून तेथेच डाटा एंट्री ऑपरेटरांना प्रोत्साहन दिल्यास, विविध दाखल्यांसाठी तालुक्याच्या ठिकाणी नागरिकांना करावी लागत असणारी धावपळ मोठ्या प्रमाणात कमी होईल. प्रशासन गावपातळीवर सक्षम होणे ही काळाची गरज असून उद्याच्या काळात त्यादृष्टीने विचार होणे गरज आहे "आजवर अशा शिबिरांत प्रामुख्याने सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनाच निमंत्रण दिले जाते, असे प्रकर्षाने जाणवले असून यापुढे या शिबिरांमध्ये सर्वपक्षीय माजी सरपंच, माजी पंचायत समिती सदस्य, माजी जिल्हा परिषद सदस्य अशा सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांना सहभागी करून घेतल्यास शासनाचा मूळ उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य होईल."



ठाणे : दिवा रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारासमोर कचऱ्याचा डोंगर निर्माण झाला असून प्रशासनाचे पूर्णतःहा दुर्लक्ष दिसून येत आहे. कोकण रेल्वेसह पश्चिम रेल्वे मार्गाला जोडणारे दिवा जंक्शन कचऱ्यात हरवू लागले असल्याचे निदर्शनास येऊ लागल्याने वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरातील जीवघेणा प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना आता प्रचंड दुर्गंधीतून वाट काढून दिवा रेल्वे स्थानकात जावे लागत आहे. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### सौ. वनिता मानकर यांना "छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण" पुरस्कार प्रदान

अहिल्यानगर (स. गांवकरी) : आई फाउंडेशन, रायगड (भारत) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्यभूमी रायगड गौरव संमेलनात अहिल्यानगर येथील श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.वनिता गणेश मानकर यांना "छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण" पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.शाल श्रीफळ, स्मृती चिन्ह,सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. याप्रसंगी कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले, प्रसिद्ध अभिनेते संतोष पाटील,प्रमुख उपस्थिती उदय वाघेरे,संमेलनाध्यक्ष रायगड येथील आई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. विनोदराव मोरे, स्वागताध्यक्ष प्रा.डॉ.बी.एन.खरात,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे रायगड अध्यक्ष राकेश खराडे,कोकण अध्यक्ष शैलैश पालकर, उद्योजक गणेश मानकर, रणरागिणी महिला फाउंडेशनचे अध्यक्षा रोहिणीताई पवार (अहिल्यानगर),संयोजन समितीचे सौ.श्वेता शिर्के (रायगड),राजश्री कोळी (अलिबाग),संदेश महाडिक (रायगड),प्रा.सोनाली जाधव (शिर्डी)आदी उपस्थित होते. सौ.वनिता मानकर यांनी श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण बचत गट या माध्यमातून व सामाजिक कार्यात नेहमी सहभाग घेऊन कार्य करत असून सौ.वनिता मानकर या रांगोळी व मेहंदी आर्टिस्ट असून त्यांनी आत्तापर्यंत १०० मुलींना शिक्षण देऊन त्यातून रोजगार उपलब्ध करून दिला आहे. प्रामाणिकपणे,निष्ठेने व सातत्यपूर्ण परिश्रमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी व मोलाचे आहे.रायगडच्या ऐतिहासिक भूमीत सौ.मानकर यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन छत्रपती शिवराय कर्तृत्व भूषण पुरस्कार २०२६ या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.



### श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त अखंड नाम,जप, यज्ञ सप्ताह

अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र चॅरिटेबल ट्रस्ट, गणेश केंद्र अहिल्यानगर येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड नाम जप यज्ञ सप्ताह ची सुरुवात गेल्या गुरुवार दि. ०९ एप्रिल २०२६ रोजी सुरू झाली. यानिमित्त सात दिवसीय गुरुचरित्र पारायणाच्या सामूहिक पठनास सुरुवात झाली. सुमारे ३०० भाविक गुरुचरित्र पारायण बसले आहेत अशी माहिती केंद्रप्रमुख सौ शोभा प्रकाश बोरुडे यांनी दिली. बुधवार दि.१५ एप्रिल २०२६ पर्यंत सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दररोज सकाळी गुरुचरित्र पारायण, नित्य स्वाहाकार , चंडी याग, स्वामी याग, रुद्र याग, गीताई याग, मल्हारी याग यांचे सामूहिक पठण व हवन होणार आहे. तसेच दररोज सकाळी ०८:००, सकाळी १०:३० व संध्याकाळी ०६:३० महाआरती सेविकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश पांडुरंग बोरुडे तसेच ट्रस्टी निलेश फिरोदे यांनी केले आहे. येत्या दि.१५ रोजी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त सकाळी १०:३० वा. महाआरती व महाप्रसाद होणार आहे तरी सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

### अहिल्यानगर- मनमाड रस्त्याचे काम सुरू ठेवण्यासाठी खंडणीची मागणी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर-मनमाड या महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांचे बिले काढायचे नाही, जर तुम्ही बिले काढले तर तुमच्याकडे बघुन घेईन, अशी धमकी देत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) प्रकल्प संचालकाला महिन्याला ५० हजार रूपयांची खंडणी मागितल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तिघांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अमरिश माणिकराव मानकर (वय- ५०, मुळ रा. अकोला, हल्ली रा. चिखलठाणा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर) यांनी फिर्याद दिली आहे. किरण शिवाजी राऊत (रा. कोल्हार खुर्द, ता. राहाता), संदीप भास्कर भगत (रा. बायपास रस्ता, शेंडी, ता. अहिल्यानगर) व ॲड. हर्षद चावला (पूर्ण नाव माहिती नाही, रा. सावेडी, अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. फिर्यादी अमरिश मानकर प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत असून सध्या त्यांच्याकडे अहिल्यानगर येथील अतिरिक्त कार्यभार आहे. मजुर सहकारी संस्था पहिला मजला, मार्केटयार्ड, अहिल्यानगर येथे त्यांचे कार्यालय असून सदर कार्यालयाच्या मार्फतीने अहिल्यानगर- मनमाड महामार्गाचे काम चालू आहे. मानकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, किरण राऊत, संदीप भगत आणि ॲड. हर्षद चावला हे तिघे गेल्या काही दिवसांपासून कार्यालयात येऊन माहिती अधिकाराच्या नावाखाली वारंवार माहिती मागत होते. गेल्या सोमवार (६ एप्रिल)रोजी हे तिघे कोणतीही परवानगी न घेता कार्यालयात घुसले. त्यावेळी किरण राऊत याने मानकर यांना धमकावत, तुम्ही आम्हाला महिन्याला ५० हजार रूपये द्यावे लागतील, अन्यथा तुम्हाला काम करू देणार नाही, असा इशारा दिला. तसेच तुमचे सर्व काही बाहेर काढू आणि रस्त्यावर फिरू देणार नाही, अशीही धमकी दिली.

# हिवरगाव आंबरे येथे रविवारी मुख्याध्यापक गुंजाळ यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा; मान्यवरांचा होणार सन्मान!

डोंगरगाव: (स. गांवकरी)

ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ, संगमनेर (सी/ओ निमगाव बु.) संचलित न्यू इंग्लिश स्कूल, हिवरगाव आंबरे (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथील मुख्याध्यापक मधुकर कारभारी गुंजाळ हे प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत असून, त्यांच्या सेवापूर्ती निमित्त भव्य गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता उत्साहात पार पडणार आहे. या कार्यक्रमात मुख्याध्यापक मधुकर कारभारी गुंजाळ यांच्यासह रेवगडे मधुकर विष्णू (माजी मुख्याध्यापक), कानवडे रमेश रामकृष्ण (मुख्याध्यापक), भागवत पांडुरंग मारुती (माजी मुख्याध्यापक), बो-हाडे विलास



बाळकृष्ण (सहशिक्षक), कानवडे भारत आत्माराम (सहशिक्षक), दिलीप भावका (कनिष्ठ लिपीक) तसेच वाकचौरे अशोक भगवंता (कर्मचारी) यांचा सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामकृष्ण नानाजी भांगरे राहणार असून, सचिव श्रीमती उज्वलाताई रामचंद्र कानवडे यांच्या शुभहस्ते कार्यक्रम पार पडणार आहे. यावेळी उपाध्यक्ष श्रीकृष्ण रेवजी पवार, सहसचिव संतोष प्रताप नेहे, खजिनदार प्रशांत बाळासाहेब कानवडे, सदस्य आबासाहेब भाऊसाहेब ठाणगे, श्रीमती निशा शिवाजी कानवडे तसेच धनंजय रामकृष्ण भांगरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरणजी लहामटे, विधानपरिषद सदस्य सत्यजितदादा तांबे तसेच एकविरा फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध वक्ते प्राचार्य प्रदीपजी कदम (संस्थापक अध्यक्ष, मानवता प्रतिष्ठाण) यांचे विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाला परिसरातील शिक्षक, विद्यार्थी, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगर शहरात विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला करत खंडणीची धमकी

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

नगर शहरातील प्रेमदान हाडको परिसरात विद्यार्थ्यावर चार जणांनी कोयत्याने हल्ला करून मारहाण केल्याची घटना घडली आहे. यश मनोज कांडेकर (वय- २१, रा. सिद्धील हाडको) असे जखमी युवकाचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात बुधवारी (८ एप्रिल) रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमोल पाडळे, तुषार भोसले, नयन तांदळे, अक्षय पवार (पूर्ण नावे माहिती नाही, सर्व रा. नीलक्रांती चौक) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. त्यातील अमोल, नयन व अक्षय यांना पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यांना चार दिवसांची (१३ एप्रिलपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली आहे. फिर्यादी यश कांडेकर हा न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. संशयित आरोपींनी यापूर्वीही कॉलेज परिसरात येऊन यश व त्याच्या मित्रांना शिवीगाळ व दमदाटी केली होती. आम्ही इथले दादा आहोत, पुन्हा दिसलात तर हात-पाय तोडू, अशी धमकी त्यांनी दिल्याचे फिर्यादी नमूद आहे.

दरम्यान, मंगळवारी (७ एप्रिल) रात्री १०.४५ वाजता यश हा त्याचा मित्र रोहन बुचकेसोबत बंटी सलूनमध्ये केस कापण्यासाठी गेला होता. त्यावेळी संशयित आरोपी तेथे आले. त्यांनी यशला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. कोयता दाखवत धमकी देत त्याच्या गळ्यातील चैन हिसकावून घेतली. तसेच आम्हाला पैसे द्यावे लागतील, नाही दिल्यास हात-पाय तोडू, अशी खंडणीची धमकी दिल्याचेही फिर्यादी म्हटले आहे. आरोपींनी कोयत्याने यश वर हल्ला केला.

# वि. ही.प. अहिल्यानगर जिल्हा नवीन नियुक्त्या जाहीर




अहिल्यानगर : (स. गांवकरी)

विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताची बैठक ५ एप्रिल रोजी पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीला केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद जी परांडे तसेच प्रांत अध्यक्ष श्री,गजानन धरणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.प्रांत मंत्री श्री. किशोर चव्हाण यांनी यावेळी नवीन नियुक्त्या जाहीर केल्या.

सध्याचे विभाग मंत्री श्री.सुनील खिस्ती यांना प्रांत सत्संग सह प्रमुख अशी अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली तर जिल्हा सहमंत्री म्हणून ,राजेंद्र चुंबळकर व प्रताप तांदळे यांची नियुक्ती करण्यात आली, तसेच बजरंग दल जिल्हा संयोजक म्हणून सोमनाथ चितळकर यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना मिलिंद परांडे यांनी सांगितले की, "संघटनेची खरी ताकद ही कार्यकर्त्यांच्या शिस्त, समर्पण आणि निष्ठेमध्ये असते.तरुण शक्तीला योग्य दिशा दिल्यास विहिंपचे कार्य अधिक व्यापक आणि परिणामकारक होईल.

या प्रसंगी जिल्हा पालक व प्रांत सहमंत्री ॲड. श्री,सतीश गोरडे,जिल्हाध्यक्ष श्री,आशुतोष लांडगे, जिल्हा मातृशक्ती प्रमुख हिराताई शहापुरे,विभाग संयोजिका पुजाताई लष्करे, दुर्गा वाहिनी जिल्हा संयोजिका जयश्रीताई पोटे तसेच प्रांतातील सर्व जिल्ह्यांमधील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीमुळे पश्चिम महाराष्ट्रात विहिंपच्या कार्याला नवी ऊर्जा मिळणार असून, संघटन विस्ताराला गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# व्यवसायाशी प्रामाणिक रहा यश हमखास : आ. काशिनाथ दाते सर

## 'माय फोन कॉर्नर शुभारंभाने उद्योजकतेचा नवा अध्याय'!



""माय फोन कॉर्नर' हा व्यवसाय केवळ विक्रीपुरता मर्यादित न राहता ग्राहकांच्या विश्वासाचा केंद्रबिंदू ठरावा आणि आपल्या युवकांनी प्रगतीची नवी उंची गाठावी," तंत्रज्ञानाच्या नव्या युगात तुमची वाटचाल यशस्वी होवो! युवकांनी व्यवसायातून प्रगती करावी, युवक सक्षम तर देश सक्षम, व्यवसाय हाच खरा मार्ग आहे, उद्योजक बना, प्रगतीचा नवा अध्याय लिहा माझ्या शुभेच्छा तुमच्या बरोबर आहेत.
**- आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

पारनेर : (स. गांवकरी)

शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ आजच्या डिजिटल युगात मोबाईल फोन ही केवळ सुविधा नसून प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक गरज बनली आहे. त्यामुळे या क्षेत्रात प्रचंड संधी उपलब्ध असून गणेश औटी व भुषण लटांबळे यांनी निवडलेला व्यवसाय दूरदृष्टीचा व भविष्यकालीन दृष्टिकोन असलेला असून त्यांच्या माध्यमातून आज सुरु होत असलेल्या 'माय फोन कॉर्नर'च्या शुभारंभाने उद्योजकतेचा नवा अध्याय सुरू होत असून व्यावसायाशी प्रमाणिक रहा यश हमखास येते असे मत आमदार काशिनाथ दाते सर यांनी पारनेर शहरातील नवी पेठ परिसरात सुरू झालेल्या 'माय फोन कॉर्नर' या आधुनिक मोबाईल शोरूमच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले

या शुभारंभ प्रसंगी माजी नगराध्यक्ष विजुभाऊ औटी, मा. जिल्हा परिषद सदस्य राजाभाऊ एरंडे, नगरसेवक अशोक चेडे, राजेंद्र औटी, ॲड. तुषार औटी, उद्योजक रामदास मते, धोंडिभाऊ पुजारी, संभाजी मगर, सरपंच देवा लटांबळे, उद्योजक दादाभाऊ लटांबळे, अर्जुन लंके, गोपी गाडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार काशिनाथ दाते बोलताना पुढे म्हणाले की, "मोबाईल विक्रीसोबतच ग्राहकांना दर्जेदार सेवा देणे, नवीन तंत्रज्ञानाची माहिती ठेवणे, योग्य मार्गदर्शन करणे आणि विश्वासार्हता टिकवणे ही या व्यवसायातील यशाची खरी गुरुकिल्ली आहे. आज ग्राहक केवळ वस्तू खरेदी करत नाही, तर तो विश्वास आणि सेवा शोधत असतो. त्यामुळे विक्रीनंतरची सेवा, योग्य किंमत, आणि ग्राहकांशी प्रामाणिक व्यवहार हे या व्यवसायात अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत."

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात बागलाण प्रथम

## तिसरा टप्पात ४९० लाभार्थी आतापर्यंत एकूण २०५८ लाभार्थी ; योजनेत बागलाण प्रथम स्थानी

सटाणा : (स. गांवकरी)

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या महत्वकाशी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचा तिसऱ्या टप्यात बागलाण तालुका अंमलबजावणी करण्याबाबत यशस्वी अव्वल स्थानी असल्याचे दिसून येत आहेत. बागलाण तालुक्यातील ब्राम्हणगांव मंडळातील एकूण ९ गावातील नागरिक संस्कृती लान्स येथील सर्व गावातील नागरिक येथे उपस्थित होते. या शिबिरास बागलांणचे आमदार दिलीप बोरसे तसेच उपविभागीय अधिकारी महेश



शेलार, बागलांणचे तहसीलदार कैलास चावडे, संजय गांधी योजनेचे नायब तहसीलदार रविद्र पाटील, भूमी अभिलेख उपाधीक्षक देवेन्द्र भावसार, निवासी नायब तहसिलदार सचिन मारके तसेच सटाणा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी भेय्या सावंत, अतुल पाटील, ब्राम्हणगांव सरपंच किरण अहिरे, त्याचबरोबर महसूल विभाग, भूमी अभिलेख, पंचायत समितीचे सर्व अधिकारी - कर्मचारी सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी देखील उपस्थित होते. यावेळेस ब्राम्हणगांव येथे ४९० इतक्या नागरिकांना घरकुल वाटप, रेशनकार्ड, आयुष्मान भारत कार्ड, ई – मोजणी, ॲग्रीस्टॅक, दाखले , जातींचे दाखले, नॉन – क्रीमीलेयर ,जिवंत सातबारा उतारे , प्रलंबित फेरफार, अभिलेख दुरुस्ती,लोकसेवा हक्क कायदा, विविध नोंदी , विविध सामाजिक अर्थसहाय्य योजना ,शासकीय विहीर वाटप, निराधार गावातील सर्व शेतकऱ्यांना ,नागरिकांना विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात आला यात अनेक नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्यांना चावीचे वाटप करण्यात आले. तीन टप्यात आतापर्यंत एकूण २०५८ इतक्या नागरिकांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. या कार्यक्रमात गावातील सरपंच, उपसरपंच, महिला बचत गट, जेष्ठ नागरिक पोलीस पाटील शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थिती नोंदवली. तसेच विविध योजना इत्यादी सर्व महसुली दाखल्यांचे अधिकाऱ्यांच्या समवेत वाटप करण्यात आले. यावेळी ब्राम्हणगांव परिसरातील शेतकरी, जेष्ठ नागरिक, अंध - अपंग यांना विविध शासकीय योजनेचा लाभ एकाच वेळी मिळाल्यामुळे सर्व नागरिकांच्या चेहरावरच आंनद दिसून येत होतो. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे आयोजनामध्ये विविध शासकीय आणि योजनाची माहिती दिली. याप्रसंगी उपस्थित सर्वांनी शासकीय अधिकारी - कर्मचारी आणि शासनाचे आभार मानले.

### रक्तदान शिबिरास ५३ लाभार्थींनी केले रक्तदान

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरात आलेल्या लाभार्थी यांनी देखील रक्तदान केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### वाशी येथे युवक काँग्रेसचे आंदोलन; अपमानजनक वक्तव्याचा तीव्र निषेध!

वाशी, नवी मुंबई (स. गांवकरी) : हिमंत बिस्वा सरमा यांनी मल्लिकार्जुन खर्गे यांच्याबाबत केलेल्या अपमानजनक वक्तव्याच्या निषेधार्थ तसेच पवन खेड़ा यांना अटक करण्याच्या प्रयत्नाविरोधात नवी मुंबई जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान संबंधित नेत्यांच्या प्रतिमेला जोडे मारून व दहन करून संताप व्यक्त करण्यात आला. आंदोलनात कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रणित शेलार, कार्यालयीन अध्यक्ष संतोषी सुतार, ऐरोली विधानसभा अध्यक्ष भीमराव भोसले, बेलापूर विधानसभा अध्यक्ष तुकाराम कदम, इंटक अध्यक्ष महेश भणगे, कोकण सहप्रभारी विनोद पाटील, प्रभारी जमील इद्रीसी, सहप्रभारी कृष्णा तवले यांच्यासह जिल्हा व विधानसभा स्तरावरील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साचलेला गाळ काढण्यासाठी आदिवासी शेतकरी बांधवांमध्ये चर्चा

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील मोठे धरण , छोटे पाटबंधारे व लघु पाटबंधारे धरणातील साचलेला गाळ काढणे गरजेचे आहे. अशी आदिवासी दुर्गम भागातील शेतकरी बांधव यांच्यात चर्चा सुरू आहे. येडगाव, माणिकडोह , पिंपळगाव जोगे , वडज , डिंभे , विसापूर चिल्हेवाडी , घोड,तळेरान , फडकी बंधारा घाटधर , उच्छिल , रामजेवाडी भिवाडे , घंगाळदरे, तांबे , व देवळे व हडसर या धरणातील साचलेला गाळ काढल्यानंतर पाणी साठ्यामध्ये वाढ होणार आहे . याबाबत तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी ताबडतोब निर्णय घेणे गरजेचे आहे . येथील आदिवासी दुर्गम भागातील शेतकऱ्यांना व महिला भगिनींना डोंगर , खडकाळ परिसरात पिण्याच्या पाण्यासाठी वणवण मार्च , एप्रिल पासुन सुरूवात झाली आहे . तालुक्यातील सर्व धरणातील पाणीसाठा कमी होत आहे . सर्व धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला आहे . एप्रिल व मे महिन्यात धरणातील साचलेला गाळ काढल्यामुळे पाणीसाठा मध्ये वाढ होईल. यामुळे शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न व जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सुटेल . याबाबत आदिवासी दुर्गम भागातील शेतकरी बांधव तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांच्या कडे मागणीकरणार आहे. अशी चर्चा सुरू आहे.



### पसायदान प्रतिमा देऊन पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचा सन्मान

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा येथील भूमिपुत्र व शिवसहकार सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालेंद्र पोतदार यांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर माऊलींची पसायदान प्रतिमा देऊन पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचा मुंबई येथील महासंचालक कार्यालयात सन्मान करण्यात आला. विद्यार्थी दशेत असतांना संत ज्ञानेश्वर माऊलींच्या "पैस" खांबाचे दर्शन घेतले आता पुन्हा दर्शन घेण्यासाठी नेवासा येथे येईन अशी ग्वाही त्यांनी पोतदार यांच्याशी सुसंवाद साधतांना दिली. राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधतांना त्यांनी नेवासा येथील सुवर्णकार समाजाचे नेते व शिवसहकार सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालेंद्र पोतदार यांना मुंबई भेटीचे निमंत्रण दिले होते त्यानुसार बालेंद्र पोतदार यांनी आपल्या पत्नी सौ.मनिषा पोतदार,चिरंजीव इंजिनिअर अथर्व पोतदार यांच्या समवेत भेट घेऊन जुन्या स्मृतींना उजाळा देत चर्चा केली. यावेळी बालेंद्र पोतदार यांनी पसायदान प्रतिमा भेट देत नेवासा येथे संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या पैस खांब मंदीराला भेट देण्याचे नियंत्रण दिले.हे निमंत्रण स्वीकारून मी विद्यार्थी दशेत माऊलीच्या दर्शनासाठी सन १९७९ साली नेवासा येथे आलो होतो आता येण्याची त्रिव ईच्छा असून मे महिन्यात मी नक्की दर्शनासाठी येईन अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलतांना दिली.नेवासा भेटीचे निमंत्रण स्वीकारल्यानंतर बालेंद्र पोतदार यांनी दाते साहेबांना धन्यवाद देत आभार मानले.




### जिल्हा परिषद उर्दू शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा खुर्द येथील पि.एम.जिल्हा परिषद उर्दू शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले.यावेळी बालचिमुकल्या विद्यार्थ्यांनी "बेटी बचाव बेटी पढाव"राष्ट्रीय एकात्मतेवर प्रबोधनात्मक एकांकीका सादर करून उपस्थित पालकांची मने जिंकली.बालकांच्या या कला आविष्काराने उपस्थित पालकांना आकर्षित केले. यावेळी झालेल्या स्नेहसंमेलनाचे उदघाटन शिक्षण विभागाचे केंद्रप्रमुख संजय शेळके,बाळासाहेब काशीद,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व अलअमीन उर्दू हायस्कूलचे संस्थापक अध्यक्ष महंमदभाई आतार,शिक्षण विभागाचे विषय तज्ञ समी शेख,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हारूणभाई जहागीरदार, नवाब बागवान,नगरसेवक असिफभाई पठाण,डॉ. राहुल चव्हाण,अब्बास बागवान उर्दू शाळेचे शिक्षक खान शकील,अलअमीन उर्दू हायस्कूलचे सर्व शिक्षक वृंद व उर्दू शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी झालेल्या स्नेहसंमेलन प्रसंगी जिल्हा परिषद उर्दू शाळेतील विद्यार्थीनीनी सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे "बेटी बचाव बेटी पढाव"आईवडीलांचा सन्मान करा,राष्ट्रीय एकात्मतेवर प्रबोधन करत राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन नाटिकाद्वारे घडविले. आपल्या कला आविष्काराने उपस्थित पालकांची मने ही जिंकली.जिल्हा परिषद उर्दू शाळेचे स्नेहसंमेलन यशस्वीतेसाठी उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका फरहाना शेख,शिक्षिका रिजवाना पठाण,हसीना शेख, गौसीया शेख,नुजहत शेख, वाजेदा शेख नाजीया सय्यद यांनी विशेष प्रयत्न केले.उर्दू शाळेचे शिक्षक खान शकील सर यांनी सूत्रसंचालन केले यावेळी विद्यार्थी पालक माता पिता मोठ्या संख्येने उपस्थित होते

# ७०२ डिजिटल सातबारा व ६६९ आठ-अ उताऱ्यांचे वाटप

**"छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये महसूल सेवा उत्तम प्रकारे राबवली जात आहे" - आ. बोंढारकर**

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ .सचिन खल्लाळ उपविभागीय अधिकारी नांदेड व संजय वारकड तहसीलदार नांदेड यांच्या निर्देशानुसार तालुक्यातील तिसरे शिबिर विष्णुपुरी येथे उत्साहात संपन्न झाले,विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या शिबिरामध्ये ग्रामविकास, आरोग्य, कृषी, भूमिअभिलेख (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक , महावितरण विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यां कडून अर्ज स्वीकारले.तहसील कार्यालय, नांदेड यांच्या वतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले. यामध्ये ७०२ ऑनलाईन सातबारा उतारे व ६६९ आठ-अ उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच १० पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले. शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८-अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या.या कार्यक्रमास मतदारसंघाचे आ . बोंढारकर यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध विभागांच्या स्टॉल्सला भेटी देऊन नागरिकांचे विविध प्रश्न ऐकून संबंधित विभागाला तात्काळ सदर प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात सूचना केल्या. यावेळी आमदार तहसील कार्यालया मार्फत देण्यात येणारे विविध प्रमाणपत्रे विहित मुदतीत देत असल्याबाबत समाधान व्यक्त केले.

छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस अभिवादन करून दीप प्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला नांदेड दक्षिणचे आ बोंढारकर यांनी मार्गदर्शन केले.नायब तहसीलदार स्वप्निल दिगलवार यांनी प्रास्ताविकातून अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली. नायब तहसीलदार माचेवाड यांनी सूत्रसंचालन केले, तर मंडळ अधिकारी श्रीकृष्ण एलमटे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. पुरवठा विभागातील मारतळेकर ,पवार यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण केले. तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी उपस्थित राहून अभियानास सहकार्य केले. या शिबीरास सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे, ऊपसरपंच प्रतिनिधी विश्वनाथ हंबर्डे, मुख्याध्यापिका उज्वला जाधव,शालेय समितीचे अध्यक्ष विलास हंबर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, पोलीस पाटील प्रविण हंबर्डे, गोविंद हंबर्डे, शहाजी हंबर्डे, रामचंद्र शेबोले,दिपक हंबर्डे,प्रकाश हंबर्डे, सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिक हंबर्डे, शिवाजी हंबर्डे, उत्तम हनवंते, पर्यवेक्षक शिवाजी वेदपाठक, यांच्या सह अकरा गावातील ग्रामस्थ सरपंच व मंडळ अधिकारी यांच्यी उपस्थिती होती. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी श्रीकृष्ण एलमटे , तलाठी रमेश गिरी,मनोज जाधव , मनोज सरपे, माधव भिसे ,महसूल सेवक बालाजी सोनटक्के यांनी विशेष योगदान दिले.शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## जुन्नरची काळी मैना बाजारात दाखल

नारायणगाव : (स. गांवकरी)

डोंगरची काळी मैना म्हणून सर्वदूर परिचित असलेली करवंदे जुन्नर तालुक्यात बहरली आहेत. यावर्षी जुन्नर तालुक्यात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे पूर्व भागातील राजुरी,बेल्हे, बांगरवाडी, आणे,उंचखडक, पेमदरा यासह पश्चिम भागात करवंदाच्या जाळ्या मोठ्या प्रमाणात असून खवय्यांकडून मोठी पसंती मिळत आहे. सध्या एका ड्रोनसाठी 50 ते 60 रुपये दर करवंदाला मिळत आहे

जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यापासून करवंदाच्या वेलींना पांढऱ्या रंगाची फुले येण्यास सुरुवात होते.ही फुले गळाल्यानंतर झाडाला हिरव्या रंगाची कच्ची करवंदे लागतात. त्यानंतर एप्रिल महिन्यात ही करवंदे पिकून काळी पडतात आणि त्यांची चव गोड होते.व ही करवंदे डोंगराळ भागात राहणारे आदिवासी बांधव आपल्या उपजीविकेसाठी सकाळी पहाटे लवकर उठून काट्याकुट्यांच्या जाळीत घुसून करवंद काढण्याचे काम करतात. त्यानंतर ही करवंदे रस्त्याच्या कडेला किंवा बाजारपेठेत विकून पोट भरतात.



## 'नारी स्वास्थ्य संवाद' उपक्रमातून आरोग्य जनजागृती

किनवट : (स. गांवकरी)

दुर्गा फाउंडेशन, किनवट यांच्या वतीने 'नारी स्वास्थ्य संवाद' या महत्वाच्या उपक्रमाचे आयोजन येथील सुमतीबाई हेमसिंग नाईक कन्या माध्यमिक विद्यालयात करण्यात आले. किशोरवयीन मुलींमध्ये शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमासाठी फिट इंडिया अभियानांतर्गत प्रमाणित holistic health coach श्वेता चांदपूरकर या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी किशोरवयीन मुलींच्या आरोग्याशी संबंधित विविध मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन केले. विशेषतः वयात येताना शरीरात होणारे बदल, योग्य आहार, मानसिक स्वास्थ्य, तसेच स्वच्छतेचे महत्त्व याबाबत त्यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. नागपूर येथे करण्यात आलेल्या किशोरवयींन मुलींच्या सर्वेक्षणाच्या आधारे किनवटमध्ये हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. भारतीय संस्कृतीत अनेकदा किशोरवयीन मुलींच्या लैंगिक व शारीरिक आरोग्याशी संबंधित विषयांवर खुलेपणाने चर्चा होत नाही. परिणामी, १३ ते १८ वयोगटातील मुलींना आवश्यक माहिती वेळेवर मिळत नाही. हीच बाब लक्षात घेऊन दुर्गा फाउंडेशनने या चर्चासत्राचे आयोजन केले. या सत्रातून मुलींना त्यांच्या आरोग्याबाबत योग्य माहिती मिळाली असून, पुढील काळात दुर्गा फाउंडेशनच्या माध्यमातून गायनॉकॉलॉजिस्ट, न्यूट्रिशनिस्ट तसेच इतर आरोग्य तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आणखी सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे मुलींमध्ये आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत झाली असून, भविष्यातही असे उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली. या उपक्रमात सुमारे ३०० मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता राठोड, दुर्गा फाउंडेशनच्या दुर्गा सुधाकर भोयर, तसेच शिक्षकवृंद यांची उपस्थिती होती.




## गावठी पिस्तुलासह दोन सराईत गुन्हेगार जेरबंद

आळेफाटा, ता. जुन्नर : (स. गांवकरी)

नाशिक जिल्ह्यातील रेकॉर्ड वरील दोन सराईत गुन्हेगारांना गावठी बनावटीचे पिस्तूल व जिवंत काडतुसांसह आळेफाटा पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी एक विना नंबरची रॉयल एनफिल्ड हंटर गाडी असा एकूण ४ लाख ५९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. दि. ७ एप्रिल २०२६ रोजी पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आळेफाटा एस.टी. स्टँड परिसरात दोन इसम अग्निशस्त्र बाळगून विना नंबरच्या रॉयल एनफिल्ड हंटर गाडीवर फिरत आहेत. माहिती मिळताच पो. नि. जाधव यांनी गुन्हे शोध पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले.



**४.५९ लाखांचा मुद्देमाल जप्त**

पो. हवा. पंकज पारखे, अमित माळुंजे, ओंकार खुणे, पो. कॉ. सचिन पाटील, सतिश टाव्हरे यांच्या पथकाने आळेफाटा- नारायणगाव रोडवर सापळा रचला. काही वेळातच बातमीप्रमाणे विना नंबरची हंटर गाडी व त्यावर दोन संशयित इसम दिसताच पोलिसांनी त्यांना घेरून सिनेस्टाईलने ताब्यात घेतले.अटक केलेल्या आरोपींची नावे १) स्वप्नील सुनिल गोसावी (वय २५, रा. जत्रा हॉटेल बळ मंदिराच्या पाठीमागे, नाशिक) व २) आकाश दिनेश कोठे (वय २९, रा. नाशिक रोड, देवळाली गाव, नाशिक) अशी आहेत. स्वप्नील गोसावी याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेजवळ पँटमध्ये एक बॅरल असलेली सिल्वर रंगाची गावठी पिस्तुल व पिस्तुलाच्या मॅगझीनमध्ये ३ जिवंत काडतुसे मिळून आली. तसेच त्यांच्याकडील विना नंबरची रॉयल एनफिल्ड हंटर गाडी असा एकूण ४,५९, ०००/- रु. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस तपासात दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे. स्वप्नील गोसावी याच्यावर ओझर, पिंपळगाव बसवंत, सिन्नर, उपनगर नाशिक पोलीस स्टेशनमध्ये खुनाचा प्रयत्न, दरोडा, शस्त्र अधिनियम असे ९ गंभीर गुन्हे दाखल आहेत. तर आकाश कोठे याच्यावर MIDC सिडको छत्रपती संभाजीनगर, इंदिरानगर व गंगापुर पोलीस स्टेशनमध्ये ३ गुन्हे दाखल असून दोघेही गंगापुर पोलीस स्टेशनच्या एका गुन्ह्यात फरार होते.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, पो. नि. प्रमोद खिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. विश्वास जाधव, पो. उपनिरीक्षक सचिन पाटील, पो. हवा. पंकज पारखे, विनोद गायकवाड, अमित माळुंजे, ओंकार खुणे, गणेश जगताप, पो. कॉ. नविन अरगडे यांच्या पथकाने केली आहे. आरोपींविरुद्ध आळेफाटा पोलीस स्टेशनला शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

## हरवलेली मुलगी शोधून कुटुंबासोबत; आनंददायी पुनर्मिलन



डांग. गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यात सापुतारा पोलिसांनी "ऑपरेशन मिलाप" अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पोलीस महानिरीक्षक प्रेमवीरसिंह (सुरत रेंज) तसेच पोलीस अधीक्षक पूजा यादव (आहवा-डांग) यांच्या मार्गदर्शनाखाली हरवलेल्या व्यक्तींना शोधण्यासाठी विशेष सूचना देण्यात आल्या होत्या. या सूचनांच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी (आहवा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली सापुतारा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक बी.बी. पटेल यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथकाने तांत्रिक तसेच मानवी साधनांचा वापर करून तपास सुरू केला. तपासादरम्यान हरवलेली मुलगी राजकोट जिल्ह्यातील जेतपूर परिसरातून शोधून काढण्यात आली. त्यानंतर योग्य समुपदेशन करून मुलीला सुरक्षितपणे सापुतारा पोलीस ठाण्यात आणण्यात आले आणि तिचे आई-वडिलांसोबत आनंददायी पुनर्मिलन घडवून आणण्यात आले.या प्रशंसनीय कार्यात प्रभारी पोलीस उपनिरीक्षक बी.बी. पटेल, ए.एस.आय. संजयभाई शंकरभाई भोये तसेच इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# प्रशासन-जनतेच्या सहभागातून विकासाला चालना

## देवदैठण महसूल समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

देवदैठण येथे आयोजित 'शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार सचिन डोंगरे होते. प्रशासन आणि जनता एकत्र आल्यास विकासाला गती मिळते, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.



शिबिरात महसूल विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. नव्याने अमलात आलेल्या धोरणांबाबत मार्गदर्शन करताना डोंगरे यांनी सांगितले की, अकृषक (NA) परवानगी प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून, एकरकमी अधिमूल्य भरण्याची तरतूद आहे. तुकडीबंदी कायद्यांतर्गत नोंदी होत नसल्या, तरी अकृषक करण्याची तरतूद असल्यास नोंद करता येते. तसेच प्रलंबित फेरफार निकाली काढणे, ७/१२ उताऱ्यातील चुका दुरुस्ती, पुरवठा विभागाच्या सेवा, आधारकार्ड दुरुस्ती आदी विषयांवरही मार्गदर्शन करण्यात आले. 'एकल खिडकी' पद्धतीतून विविध दाखले नागरिकांना वितरित करण्यात आले.

कृषी विभागामार्फत महाडीबीटी ॲप डाऊनलोड करून शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. लाभार्थ्यांना ट्रॅक्टर व विविध कृषी अवजारे वितरित करण्यात आली. आरोग्य विभागाकडून रक्तदाब, मधुमेह व हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी त्याचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. याप्रसंगी अरणगावचे सरपंच मोहनराव आढाव व विलास वाघमारे यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाला पुरवठा निरीक्षक प्रज्ञा थोरात, डॉ. नेहा गोपाळे, सहाय्यक कृषी अधिकारी निलेश्वरी गायकवाड, उपसरपंच रेश्मा कोठाळे, सामाजिक कार्यकर्ते विश्वास गुंजाळ, उद्योजक दादाभाऊ वाखारे, बाळासाहेब लोखंडे, मुख्याध्यापक विशाल डोके, नागेश म्हस्के, ग्राम महसूल अधिकारी आकाश ढोरमले, शारुख सय्यद, विनोद जाधव, शिवाजी हजारे, महसूल सहाय्यक अकबर शेख, विलास वेताळ, मच्छिंद्र गायकवाड, ओम गायकवाड आदींसह मंडळातील पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. सचिन ओहळ यांनी केले. प्रास्ताविक शिवाजी हजारे यांनी मांडले, तर आभार मंडळाधिकारी एस. एम. मगर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महसूल, आरोग्य व कृषी विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## काटई-ऐरोली रस्ता प्रकल्पातील बाधितांसोबत बैठक पार

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात काटई-ऐरोली रस्ता प्रकल्पातील बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांसोबत बैठक पार पडली. सदरची बैठक आमदार राजेश मोरे यांच्या प्रयत्नाने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांसोबत आयोजित करण्यात आली होती. या बैठकी मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले कि येणाऱ्या आठवड्यामध्ये ठाणे महानगरपालिका अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांना निवेदन पत्र देण्यात येईल व बाधित शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देण्यात येईल. सदर बैठकीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य व न्याय्य मोबदला देण्यात येईल, यावर अधिकृतपणे शिक्कामोर्तब करण्यात आले. हा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासा दायक ठरणार आहे. प्रसंगी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना निलेश पाटील, नगरसेवक गजानन पाटील साहेब , मधुकर पाटील, सुनील पवार, पंढरी पाटील, राकेश भोईर, राम पाटील, अनंता म्हात्रे, किशोर म्हात्रे, सावन ठाकूर, निखिल देवकर व सदर प्रकल्प बाधित अनेक शेतकरी उपस्थित होते.



## ठाणे महानगरपालिकेच्या पावसाळा पूर्व नालेसफाईस मुंब्रा येथून प्रारंभ

ठाणे (स. गांवकरी) : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिका हद्दीतील नालेसफाईच्या कामाचा शुभारंभ आज मुंब्रा परिसरातून करण्यात आला. मुंब्र्यातील अमृतनगर नाला येथे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या शुभहस्ते विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ. शानू पठाण यांच्या उपस्थितीत नालेसफाईच्या कामास सुरूवात करण्यात आली. आज मुंब्रा येथून नालेसफाईस सुरूवात झाली असून संपूर्ण शहरातील नाले सफाईची कामे मे महिन्याच्या अखेरपर्यत पूर्ण होतील या दृष्टीने प्रशासनाने नियोजन करण्याच्या सूचना महापौरांनी यावेळी दिल्या. मुंब्रा प्रभाग क्र. 32 मधील अमृत नगर येथील नाल्यापासून नालेसफाईला प्रारंभ करण्यात आला. यावेळी स्थानिक नगरसेविका मरझिया पठाण तसेच परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. दरवर्षी नालेसफाईला उशीरा सुरूवात होते. मात्र यावर्षी एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातच नालेसफाईस सुरूवात करण्यात आली आहे, लवकरच ठाणे शहरातील सर्व नाल्याच्या सफाईला देखील सुरूवात होणार आहे. नालेसफाईनंतर नाल्यातील काढलेला गाळ हा रस्त्याच्या कडेला न ठेवता तो तात्काळ उचलला जाईल याची देखील दक्षता घेण्याच्या सूचना महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी संबंधित विभागाला दिल्या. तसेच प्रत्येक प्रभागात स्वच्छता निरीक्षक, उपमुख्यस्वच्छता निरीक्षक यांनी नालेसफाईच्या कामावर लक्ष ठेवावे. तसेच उघड्या असलेल्या नाल्यांमध्ये नागरिकांनी देखील कचरा टाकू नये असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी यावेळी केले.



## प्रांजली एम.पी.एस.सी.परीक्षेत राज्यात प्रथम; कर सहाय्यक पदी निवड

राजगुरुनगर, (स. गांवकरी) : राजगुरुनगर येथील प्रांजली सावंत हिने एम.पी.एस.सी.परीक्षेत इतर मागास वर्ग महिला प्रवर्ग गटात राज्यात प्रथम क्रमांकाचे उत्तुंग यश संपादन केले असून तिची कर सहायक या पदासाठी निवड झाली आहे. प्रांजली ही महात्मा गांधी विद्यालयाची सन २०१८ च्या एस.एस.सी बॅचची विद्यार्थीनी आहे. कोणत्याही प्रकारचा खासगी क्लास न लावता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत तिने हे यश संपादित केले आहे. प्रांजली म्हणाली की माझ्या या यशामध्ये खेड तालुका एज्युकेशन सोसायटी आणि महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे मोलाचे योगदान आहे. अभ्यासाची खरी आवड मला शालेय जीवनापासूनच निर्माण झाली. स्वयं अध्ययन व वेळेचे नियोजन यामुळेच मला हे यश संपादन करता आले. माझ्या या यशामध्ये माझी आई व भावाचे अविरत परिश्रम आहेत. प्रांजलीच्या यशाबद्दल खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष अजित लुणावत, मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी, सर्व संचालक मंडळ, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, प्राचार्या संध्या कांबळे, अधिकारी वर्ग, शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

## जळीतग्रस्त कुटूंबाला माऊली सेवा प्रतिष्ठानच्या वतीने मदतीचा हात



राजगुरुनगर, (स. गांवकरी) : भीषण आगीत घरातील सर्व संसार उपयोगी वस्तू जाळून खाक झाल्याने उघड्यावर आलेल्या जळीत ग्रस्त कुटुंबास येथील माऊली सेवा प्रतिष्ठान माध्यमातून मदत करण्यात आली. खेड तालुक्यातील जऊळके बुद्रुक गावातील आदिवासी ठाकर समाजातील राहुल सिताराम खंडागळे यांच्या राहत्या घराला सोमवार दिनांक ६ रोजी दुपारी भीषण आग लागली होती. या आगीत खंडागळे यांचेकडील ८ मोठ्या शेळ्या, ५-६ लहान बकरे, काही कोंबड्या तसेच घरातील सर्व साहित्य तसेच रोख रक्कम रु.60000/- साठ हजार रुपये रुपये आगीत जळून खाक झाले. त्यामुळे खंडागळे यांचे मोठे नुकसान होऊन त्यांचे कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले . या घटनेची माहिती कळताच *राजगुरूनगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून या कुटूंबास साधारण दोन महिने पुरेल एवढा किराणा आणि महिला, पुरुष व लहान मुलांसाठी मोठया प्रमाणात कपडे देण्यात आले.तसेच *राजगुरूनगर सहकारी बँकेचे संचालक गणेश थिगळे व रोहिणी थिगळे यांनी या जळीतग्रस्त कुटुंबास दहा हजार रुपयांची आर्थिक मदत केली.

# हंगामा ओटीटी सादर करत आहे 'मंगलमुखी'

## ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) पोलीस अधिकारीची रहस्यमय क्राइम सिरीज

मुंबई : (स. गांवकरी)

भारतातील प्रमुख डिजिटल एंटरटेनमेंट प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने आपली नवीन ओरिजिनल सिरीज 'मंगलमुखी' 9 एप्रिल 2026 रोजी लॉंच केली. ही वाराणसी आणि मुंबईच्या विरोधाभासी पार्श्वभूमीवर आधारित एक वास्तववादी आणि थरारक क्राईम ड्रामा सिरीज आहे. या सिरीजमध्ये एला डी वर्मा मुख्य भूमिकेत असून, नामिश तनेजा, रति पांडे आणि तान्या शर्मा देखील आहेत. सिरीजमध्ये एका तणावपूर्ण हत्या रहस्यासोबत ओळख, सन्मान आणि सहनशक्ती यांची भावनिक कथा सांगितली आहे.





'मंगलमुखी' ही सिरीज मंगल नावाच्या एका ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) पोलीस अधिकारीच्या जीवनावर आधारित आहे. तिला तिच्या विभागाकडून नेहमीच दुर्लक्षित केले गेले आणि खिल्ली उडवली गेली. पण जेव्हा तिला एका लोकप्रिय टीव्ही स्टारच्या कॅमेऱ्यासमोर झालेल्या रहस्यमय मृत्यूची पहिली मोठी केस मिळते, तेव्हा तिचे आयुष्य अचानक बदलते, जे तिला वाराणसी सोडून मुंबईच्या मनोरंजन क्षेत्राच्या अंधाऱ्या जगात खेचून आणते. सुरुवातीला एक अपघात वाटणारी ही घटना लवकरच एका थरारक तपासात बदलते, ज्यामुळे मंगलला केवळ न्यायासाठीच नव्हे, तर तिच्या संपूर्ण कारकिर्दीत नाकारल्या गेलेल्या मान्यतेसाठीही लढा द्यावा लागतो.

तिच्या पात्राबद्दल बोलताना, एला डी वर्मा म्हणते, "मंगलमुखी ही फक्त एका पोलीस अधिकारीची कथा नाही, तर ती ओळख, धैर्य आणि आत्मविश्वासाची कथा आहे. तिचा हा प्रवास केवळ लिंगापुरता मर्यादित नाही. समाज तुमच्याकडे कसे पाहतो यावर तुमच्या क्षमता ठरत नाहीत, हे सिद्ध करण्याबद्दल हा प्रवास आहे. ती हुशार, धैर्यवान आणि निडर आहे, आणि म्हणूनच मला तिचे पात्र आवडले. ही भूमिका साकारताना मला भावनिक आणि प्रेरणादायी अनुभव आला, आणि मला आशा आहे की प्रेक्षक तिच्या सामर्थ्याशी तितकेच जोडले जातील, जितके मी जोडले गेले." नामिश तनेजा म्हणतो, "ही अशी कथा अनुभवण्याची माझी पहिलीच वेळ आहे, आणि ट्रान्सजेंडर(तृतीयपंथी) अभिनेत्रीसोबत जवळून काम करणे हा एक अत्यंत समृद्ध करणारा अनुभव होता. एला ही एक अतिशय छान व्यक्ती आहे आणि ती तिच्या अभिनयात गहनता आणि प्रामाणिकपणा आणते. मंगलमुखी'बद्दल मला आवडणारी गोष्ट म्हणजे, ही सिरीज अशा गोष्टींना सामान्य बनवते, ज्या नेहमीच सामान्य असल्या पाहिजेत – ती गोष्ट म्हणजे प्रतिभा आणि भावना लिंगापलीकडे जातात. या प्रवासाचा भाग होणे खूप खास आणि अर्थपूर्ण अनुभव होता." तिच्या अनुभवाबद्दल विचारल्यावर, रती पांडे म्हणते, "एक अभिनेत्री म्हणून मंगलमुखी मला अशा प्रकारे आव्हान देणारी होती, ज्याचा अनुभव मी यापूर्वी कधीच घेतला नव्हता. या सिरीजच्या थराराखाली एक मजबूत भावनिक धक्का आहे, आणि त्यामुळे ती इतकी आकर्षक बनते. ही कथा स्वतःला ओळखण्याबद्दल, आपले म्हणणे ऐकून घेण्याबद्दल आणि अशा जगात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी लागणारे धैर्य शोधण्याबद्दल आहे, जे जग अनेकदा तुम्हाला स्वीकारायलाच तयार नसते. तान्या शर्मा सांगतात, "माझ्या या पात्राबद्दल मला सर्वात मनोरंजक वाटणारी गोष्ट म्हणजे, अत्यंत तणावपूर्ण परिस्थितीत वावरत असताना ती भीती, अनिश्चितता आणि दबावाचा सामना कशा प्रकारे करते. तिला अशा परिस्थितीत ओढले जाते जे तिच्या नियंत्रणाबाहेर असतात, आणि याच गोष्टीमुळे तिचा प्रवास खूप वास्तविक आणि समजण्यास सुलभ वाटते. मंगलमुखी केवळ एका रहस्यावर आधारित कथा नाही.

## असामाजिक घटकांच्या निष्काळजीपणामुळे वीज संकट

डांग , गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील सापुताऱ्याच्या पायथ्याशी असलेल्या मालेगाव परिसरात ही गंभीर घटना घडली आहे. जंगलात लावण्यात आलेल्या आगीमुळे GEB ची 11 केव्ही मुख्य वीज केबल पूर्णपणे जळून गेल्याने संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही अज्ञात असामाजिक घटकांनी जंगलात आग लावली होती. सुक्या गवतामुळे आणि जोरदार वाऱ्यामुळे आगीने झपाट्याने विकराळ रूप धारण केले. ही आग जमिनीखालून जाणाऱ्या 11 केव्ही केबलपर्यंत पोहोचल्याने हजारो व्होल्ट प्रवाह वाहणारी केबल काही क्षणांत वितळून निकामी झाली. घटनेची माहिती मिळताच GEB चे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मोठा अपघात टाळण्यासाठी त्यांनी जीव धोक्यात घालून मुख्य वीजपुरवठा बंद केला. त्यानंतर मोठ्या प्रयत्नांनंतर जंगलातील आग आटोक्यात



आणण्यात आलीअत्यंत प्रतिकूल परिस्थिती आणि प्रचंड उष्णतेतही कर्मचाऱ्यांनी नवीन केबल टाकण्याचे काम सुरू केले आहे. सध्या वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. केबल पूर्णपणे जळाल्यामुळे मोठे नुकसान झाले असले तरी नागरिकांना जास्त काळ अंधारात राहावे लागू नये यासाठी वीज विभागाचे कर्मचारी सतत काम करत आहेत. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये असामाजिक घटकांविरोधात तीव्र संताप व्यक्त होत असून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## झूमने झूम कॉन्टॅक्ट सेंटर सेवांच्या सुविधा वाढवल्या

पुणे : (स. गांवकरी)

- आता देशातच स्थानिक फोन नंबर उपलब्ध
- आता सहा टेलिकॉम सर्कलमध्ये सेवा सुरू
- क्लाऊडवर आधारित एआय तंत्रज्ञानामुळे ग्राहकांना अधिक सहज आणि स्मार्ट अनुभव मिळणार


ZOOM

झूम कम्युनिकेशन्स, इंक. (NASDAQ:ZM) यांनी आज जाहीर केले की भारतात झूम कॉन्टॅक्ट सेंटर साठी स्थानिक (नॅटिव्ह) फोन नंबरची सुविधा सुरू झाली आहे. ही सेवा महाराष्ट्र, तमिळनाडू (चेन्नई), मुंबई, दिल्ली NCR, कर्नाटक (बेंगळुरू) आणि आंध्र प्रदेश व तेलंगणा (हैदराबाद) या सहा टेलिकॉम सर्कलमध्ये उपलब्ध आहे. या सुविधेमुळे भारतातील कंपन्यांना ग्राहकांशी संपर्क साधणे अधिक सोपे होणार असून, नियमांनुसार आणि एआयच्या मदतीने उत्तम सेवा अनुभव देता येणार आहे. ही सेवा झूम इंडिया मार्फत दिली जाते. त्यांच्याकडे भारत सरकारच्या दूरसंचार विभागाचा (DoT) संपूर्ण भारतासाठी परवाना आहे. आता स्थानिक भारतातील नंबर उपलब्ध झाल्यामुळे कंपन्या त्यांच्या एजंट्स आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने क्लाऊड-आधारित कॉन्टॅक्ट सेंटर सेवा सहजपणे चालवू शकतात आणि स्थानिक नियमांचे पालन करू शकतात. झूम कॉन्टॅक्ट सेंटर हे एक कनेक्टेड प्लॅटफॉर्म आहे, जिथे व्हॉईस कॉल, व्हिडिओ, चॅट आणि इतर डिजिटल सेवा एकत्र मिळतात. यामध्ये प्रगत एआय फीचर्स असल्यामुळे एजंट्सना मदत मिळते आणि अनेक ग्राहकांशी संवाद अधिक जलद व अचूक पद्धतीने पूर्ण होतात. त्यामुळे ग्राहकांचा अनुभव सुधारतो आणि कामकाज अधिक कार्यक्षम बनते. वेलचामी शंकरलिंगम, अध्यक्ष (प्रॉडक्ट आणि इंजिनिअरिंग), झूम यांनी सांगितले, "ग्राहक सेवा क्षेत्रात मोठा बदल होत आहे. आता फक्त ग्राहकांशी बोलणे नाही, तर त्यांच्या समस्यांचे पूर्ण समाधान देण्यावर जास्त भर दिला जात आहे, ज्याला आम्ही 'रिझोल्यूशन इकॉनॉमी' म्हणतो. झूम कॉन्टॅक्ट सेंटरमध्ये मध्ये एआय तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यामुळे ग्राहकाचा प्रवास सुरुवातीपासून शेवटपर्यंत नीट हाताळली जाते आणि त्याला योग्य समाधान मिळते. भारतात स्थानिक फोन नंबर सुरू केल्यामुळे कंपन्यांना अधिक स्मार्ट आणि वैयक्तिक ग्राहक सेवा देता येईल, ज्यामुळे समस्यांचे निराकरण जलद होईल आणि ग्राहकांशी नातेसंबंध मजबूत होतील. भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या बाजारासाठी हे खूप महत्त्वाचे आहे, कारण येथे स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांना जलद वाढीसोबतच चांगली सेवा आणि नियमांचे पालन राखणे गरजेचे असते." समीर राजे, जनरल मॅनेजर आणि भारत व सार्क विभाग प्रमुख, झूम म्हणाले, "भारत हा झूम साठी अत्यंत महत्त्वाचा आणि वेगाने वाढणारा बाजार आहे. त्यामुळे आम्ही स्थानिक गरजांनुसार नवीन सुविधा विकसित करून कंपन्यांना अधिक प्रभावीपणे स्पर्धा करण्यास आणि ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा पूर्ण करण्यास मदत करत आहोत. भारतातील अनेक कंपन्या त्यांच्या ग्राहक सेवा पद्धतीमध्ये बदल करत आहेत आणि फक्त संवाद न ठेवता समस्या सोडवण्यावर जास्त लक्ष देत आहेत. त्यामुळे तुकड्या तुकड्यांमध्ये सेवा देण्याऐवजी एकसंध आणि परिणामकारक अनुभव देणे आता गरजेचे झाले आहे. झूम कॉन्टॅक्ट सेंटरसाठी भारतातील स्थानिक नंबरमुळे कंपन्यांना क्लाउड सेवांचा वापर करून पूर्णपणे कनेक्टेड आणि स्मार्ट ग्राहक अनुभव देता येईल.

## निक आणि अनन्या यांच्या पुढाकाराने उत्साह वाढवला

पुणे : (स. गांवकरी)

परीक्षांचा काळ जवळ आला की, संपूर्ण कुटुंबात तणावाचे वातावरण निर्माण होते. वाढत्या अपेक्षा आणि दबावामुळे मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होतो. हीच बाब ओळखून निक इंडिया आणि अनन्या पांडेच्या 'सो पॉझिटिव्ह' पुढाकाराने एकत्र येत मुलांसाठी आणि पालकांसाठी प्रेशर को बोलो बाय या विशेष मोहिमेचे आयोजन केले आहे.



निक इंडियाची सुरू असलेली मोहिम प्रेशर को बोलो बायचा भाग असलेला हा उपक्रम पालकांना आपल्या मुलांच्या अद्वितीय क्षमता ओळखून आणि तुलना करण्याऐवजी त्यांचा आत्मविश्वास वाढवून परीक्षेचा ताण कमी करावा, असे आवाहन करतो. 'सो पॉझिटिव्ह' अशा क्रियाकलापांच्या माध्यमातून तरूणांना अधिक अर्थपूर्ण व मनमोकळेपणाने संवाद साधण्यास प्रेरित करत आहे, ज्यासह अनन्या यांना मुले व त्यांच्या कुटुंबं भावनिक आरोग्याबाबत संवाद अधिक सहज व मोकळेपणाने करण्याची आशा आहे. या मोहिमेअंतर्गत विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये अनन्या पांडे निकचे लोकप्रिय पात्र चिक्कू आणि बंटी यांच्यासोबत सहभागी झाल्या होत्या. मुलांनी फुग्यांवर आपल्या परीक्षेच्या चिंता लिहिल्या होत्या. अनन्या यांनी ते फुगे फोडून तणाव घालवण्याचे सोपे उपाय सर्वांना सांगितले. तसेच या खेळकर कृतीतून मुलांमधील अदृश्य तणाव कमी करून त्यांना आनंदी राहण्याचा संदेश देण्यात आला. अनन्या यांच्या सहभागाने परीक्षेदरम्यान येणारा तणाव दूर होण्यास मदत झाली आणि असे लहान बदल मोठे फरक घडवून आणू शकतात, हे दाखवून दिले.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत अनन्या पांडे म्हणाल्या, प्रत्येक विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण असतो, पण परीक्षा म्हणजे सर्वस्व नाही हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. मोठी होत असताना मला समजले की, तणाव हाताळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे शांत राहणे, दीर्घ श्वास घेणे आणि स्वतःला सांगणे की, परीक्षा हा जीवनातील मोठ्या प्रवासाचा छोटासा भाग आहे. मला निक इंडियाच्या प्रेशर को बोला बाय मोहिमेचे विशेष कौतुक वाटते, कारण ही मोहिम मुले आणि पालकांना तणावाबद्दल मोकळेपणाने बोलण्यास आणि आनंदाने, अधिक सकारात्मकपणे हाताळणी करण्यास प्रोत्साहित करते. कधी-कधी फक्त थांबणे, आपल्या भावना व्यक्त करणे किंवा अपेक्षांकडे काहीसे दुर्लक्ष करणे या छोट्या गोष्टीही खूप मोठा बदल घडवून आणू शकतात. परीक्षेचा तणाव वाढत असताना परीक्षा पे चर्चा सारख्या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांप्रमाणे ही मोहीम देखील मुले व त्यांच्या कुटुंबांसाठी महत्त्वपूर्ण बाबींवर लक्ष केंद्रित करते. पुढे जात निक इंडियाचा अशा प्रकारचे संवाद सुरू ठेवून कुटुंबांना परीक्षेच्या काळाकडे अधिक सकारात्मकतेने आणि आत्मविश्वासाने पाहण्यास मदत करण्याचा मनसुबा आहे.

## समता सप्ताहानिमित्त भव्य स्वच्छता अभियान

वसमत: (स. गांवकरी)

वसमत नगरपरिषदेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होत असलेल्या समता सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर वसमत शहरात विशेष स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. दि. १० एप्रिल २०२६ रोजी आयोजित या मोहिमेत नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दि. ८ ते १४ एप्रिल दरम्यान समता सप्ताह साजरा करण्याच्या अनुषंगाने जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी तसेच अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून वसमत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील पुतळा परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. या वेळी नगराध्यक्षा सौ. सुनिता मनमोहन बाहेती, मुख्याधिकारी सय्यद रफिक,




नगरसेवक दिलीप भोसले, वर्षा युवराज अवटे, स्वच्छता निरीक्षक बालाजी सोनवणे, माधव सूक्ते, शहर समन्वयक प्रवीण दहिवाळ, मुकादम भुजंग भिसे यांच्यासह स्वच्छता कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. अभियानादरम्यान परिसरातील कचरा हटवून स्वच्छता करण्यात आली तसेच नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत 'स्वच्छ शहर, सुंदर शहर' हा संदेश देण्यात आला. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# "राका" – अल्लू अर्जुन यांच्या वाढदिवशी शीर्षकाचे अनावरण

### ॲटली यांच्या भव्य फँटसी-ॲक्शन एंटरटेनरचा जागतिक परिचय

पुणे : (स. गांवकरी)

भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक अपेक्षित सहकार्यांपैकी एकाच्या ऐतिहासिक क्षणी, एए22 x ए6 (AA22 x A6) च्या निर्मात्यांनी आज सकाळी 11 वाजता चित्रपटाचे अधिकृत शीर्षक "राका" जाहीर केले, ज्याद्वारे आयकॉन स्टार अल्लू अर्जुन यांच्या वाढदिवसानिमित्त एक प्रभावी घोषणा करण्यात आली.



टायटल रिव्हीलसोबत एक प्रभावी टायटल पोस्टरही सादर करण्यात आले आहे, जे चित्रपटाच्या जगाची झलक देते. गडद, तीव्र आणि त्याच्या व्हिज्युअल टोनमध्ये प्राणी-सदृश भासणारे. ही दृश्यरचना एका भव्य कथानकाची पार्श्वभूमी तयार करते आणि एका शक्तिशाली तसेच अत्यंत रोचक विश्वाची झलक देते. भव्य फँटसी-ॲक्शन एंटरटेनर म्हणून सादर होणारा "राका" हा एक जागतिक सिनेमॅटिक स्पेक्टॅकल म्हणून उभा राहणार आहे, जो विविध बाजारपेठांतील प्रेक्षकांशी जोडला जाईल अशा पद्धतीने डिझाइन करण्यात आला आहे. सन पिक्चर्सच्या बॅनरखाली आणि भव्य प्रमाणावर तयार होणारा हा चित्रपट स्केल, कथाकथन आणि अत्याधुनिक सिनेमॅटिक क्राफ्ट यांचे प्रभावी मिश्रण सादर करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. अल्लू अर्जुन या चित्रपटात पूर्णपणे नव्या अवतारात दिसणार आहेत, जो त्यांच्या आधीच्या भूमिकांपासून लक्षणीय बदल दर्शवतो आणि त्यांना एका शक्तिशाली व परिवर्तनशील रूपात सादर करतो. आपल्या कलाकारांना नव्या आयामात सादर करण्यासाठी ओळखले जाणारे दिग्दर्शक ॲटली पुन्हा एकदा मानदंड उंचावतात. आणि हा अभिनेता म्हणून त्यांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल असे पात्र साकारत आहेत.

भव्य आणि विस्तीर्ण सिनेमॅटिक विश्वांची निर्मिती करण्यासाठी प्रसिद्ध असलेले ॲटली "राका"मध्ये आपली वैशिष्ट्यपूर्ण दृष्टी आणतात, जिथे ते फँटसी, ॲक्शन आणि भावना यांचे सुरेख मिश्रण घडवतात. चित्रपटाचा आवाका आणि महत्त्वाकांक्षा अशी कथाकथन शैली दर्शवतात, जी भारतीय सिनेमात रुजलेली असली तरी जागतिक प्रेक्षकांशी जोडण्याचा प्रयत्न करते. दिग्दर्शक ॲटली म्हणतात, "राका हा फक्त एक चित्रपट नाही... तो माझा एक भाग आहे, जो मी अनेक वर्षे जपला आहे. 18 वर्षे मी एका कल्पनेला धरून ठेवले, तिला कधीही फिका पडू दिले नाही. तिने मला घडवले, मला कसोटीला लावले आणि प्रत्येक क्षणी माझ्यासोबत राहिली. आणि खरं सांगायचं तर... ही फक्त सुरुवात आहे." सन पिक्चर्स म्हणते, "राका हा भारतीय सिनेमाच्या सर्वोच्च महत्त्वाकांक्षेतून जन्मलेला एक सहकार्य प्रकल्प आहे. सन पिक्चर्ससाठी हा अभिमानाचा क्षण आहे की आम्ही ॲटली यांच्या अद्वितीय कथाकथन शैलीला आणि अल्लू अर्जुन यांच्या आयकॉनिक व्यक्तिमत्त्वाला एकत्र आणत आहोत, एका अशा प्रकल्पात जो जगासाठी तयार करण्यात आला आहे. आम्हाला विश्वास आहे की हे केवळ आमच्या निर्मितीच्या आवाक्याला नव्याने परिभाषित करणार नाही, तर जागतिक मनोरंजन क्षेत्रात भारतीय सिनेमाचे योग्य स्थानही अधोरेखित करेल." हा चित्रपट सन पिक्चर्स, आयकॉन स्टार अल्लू अर्जुन आणि ब्लॉकबस्टर दिग्दर्शक ॲटली यांच्यातील ऐतिहासिक सहकार्य दर्शवतो. ज्यामध्ये भारतीय सिनेमातील तीन प्रभावशाली सर्जनशील शक्तींना एकत्र आणले आहे, एका आंतरराष्ट्रीय स्तरासाठी तयार केलेल्या प्रकल्पासाठी.

आता शीर्षक जाहीर झाल्यानंतर, "राका" एका अशा सिनेमॅटिक अनुभवाची दिशा निश्चित करतो, जो धाडसी, प्रभावी आणि जागतिक स्तरावर खऱ्या अर्थाने पथदर्शी ठरण्याचे आश्वासन देतो.

## थोडक्यात पण महत्वाचे



### बिलोली त शहर विकास कृती समिती तर्फे पाणपोई

बिलोली (स.गांवकरी) : कै.व्यंकटेश कुंचनवार यांच्या स्मरणार्थ बिलोली शहर विकास कृती समितीच्या वतीने बिलोली शहरात जुन्या बसस्थानक परिसरात शुक्रवारी पाणपोईचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. शहर विकासाचा ध्यास घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून बिलोली शहर विकास कृती समिती काम करते. त्याच अनुषंगाने कै. व्यंकटेश कुंचनवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी पाणपोईचे स्टॉल लावून तहानलेल्यांची तृष्णा भागविली जाते. यंदाही उष्णतेची तीव्रता पाहून आणि या मार्गावरून जाणाऱ्या पादचाऱ्यांना पिण्यास पाणी मिळावे या हेतूने बिलोली शहर विकास कृती समितीतर्फे शुक्रवारी जुना बस स्थानक परिसरात पाणपोईचे उद्घाटन सहायक पोलीस निरीक्षक कोमल शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहर विकास कृती समितीचे अध्यक्ष गोविंद मुंडकर, माजी नगराध्यक्ष तथा शहर विकास कृती समितीचे कार्याध्यक्ष सुभाष पवार,माजी नगराध्यक्ष तथा कृती समितीचे सचिव विजयकुमार कुंचनवार, माजी नगराध्यक्ष यादव तुडमे, माजी उपाध्यक्ष तथा नगरसेवक यशवंत गादगे, नगरसेविका मैमुना बेगम अमजद खान, माधव जाधव, श्रीमती मीरा संगनोर, रायकंठवार, अभिजीत तुडमे, माजी नगरसेवक अमजद चाऊस, सय्यद रियाज, आदी उपस्थित होते.



### "साहित्यरत्न" पुरस्काराने कवी सचिन टोंगळे सन्मानित

नांदेड (स. गांवकरी) : जोशाबा बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र ही दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करत असते नांदेड येथे स्थायिक असलेले मूळचे चिंचोली,जि. सोलापूरचे कवी सचिन टोंगळे यांना यावर्षी " आदर्श साहित्यरत्न पुरस्कार " देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रम कुर्डुवाडी, जि.सोलापूर येथे संपन्न झाला . कवी सचिन टोंगळे यांच्या वतीने त्यांचे मोठे बंधू सागर टोंगळे यांनी या पुरस्काराचा स्वीकार केला.यावेळी विविध क्षेत्रातील एकूण २९ मान्यवरांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. डॉ.जयंत करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली तर संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देवकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध अभिनेते अंकुश आतकर यांनी केले.

### पुण्यतिथीनिमित्त हभप सोपान महाराज सानप शास्त्री यांचे किर्तन



नांदेड (स. गांवकरी) : कै. शिवाजीराव पाटील घोगरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त हभप सोपान महाराज सानप शास्त्री यांच्ये किर्तन. नवीन नांदेड - सामाजिक कार्यकर्ते कै. शिवाजीराव दत्तराम पा.घोगरे यांच्या व्दितीय पुण्यतिथीच्या कार्यक्रम निमित्ताने श्री हभप सोपान महाराज सानप शास्त्री वेलतुरा जि.हिगोली यांच्या किर्तनाचा कार्यक्रमाचे आयोजन दतकृपा मंगल कार्यालय येथे 11 मार्च रोजी दुपारी 2 वाजता आयोजित करण्यात आले आहे. या किर्तन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन मनपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी केले आहे.

### संतांनी मराठी भाषेला समृद्ध केले – डॉ. गजानन देवकर


मुदखेड (स. गांवकरी) : महाराष्ट्राला संतांची थोर परंपरा लाभलेली असून संतांनी लोकभाषेचा प्रभावी वापर करून समाजप्रबोधन केले.अशा मराठी संत साहित्यामुळे मराठी भाषा अधिक समृद्ध झाली. तसेच मराठी संतांच्या भाषिक योगदानामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही असे प्रतिपादन डॉ. गजानन देवकर यांनी केले. मुदखेड येथील गांधी महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने आयोजित 'मराठी संतांचे भाषिक योगदान' या विषयावरील विशेष व्याख्यानाच्या कार्यक्रमात डॉ.गजानन देवकर येथे अतिथी व्याख्यानात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ.माधव बसवंते हे होते,तर यावेळी मराठी विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ.संदीप कोरडे हे उपस्थित होते. डॉ. गजानन देवकर आपल्या मार्गदर्शनात पुढे म्हणाले की, मराठी संतांचे भाषिक योगदान अनन्यसाधारण असून संताचे वाङ्मयीन कार्य अद्वितीय असल्याचे सांगितले. प्रथमत: मराठी विभागप्रमुख डॉ.माधव बसवंते यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. संदीप कोरडे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुदखेड श्री कालेजी देवी मंदिरात १४ मे रोजी 'कलशारोहण सोहळा

मुदखेड (स. गांवकरी) : येथील ग्रामदैवत श्री कालेजी देवी मंदिरात येत्या १४ मे महिन्यात भव्य 'कलशारोहण सोहळा' अत्यंत उत्साहात साजरा केला जाणार आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण मुदखेड नगरी भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. विद्यारण्य भारती जगद्गुरु शंकराचार्य (हंपी महासंस्थान, कर्नाटक) यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. हा सोहळा गुरुवार, दिनांक १४ मे २०२६ रोजी सकाळी ९:०५ मिनिटांनी पार पडेल. कलशारोहण सोहळ्याच्या निमित्ताने भाविकांना भक्तीरसाची मेजवानी मिळणार आहे. ७ मे ते १३ मे २०२६ या कालावधीत दररोज दुपारी ३:०० ते ६:०० या वेळेत ह.भ.प. अमोल महाराज नळेगावकर यांच्या रसाळ वाणीतून 'श्रीमद् देवी भागवत कथा आयोजन करण्यात आले. हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री कालेजी देवी देवस्थान व समस्त गावकऱ्यांकडून जोरदार तयारी सुरू आहे. ग्रामस्थांनी आपल्या घरातील लेकी-बाळींना या सोहळ्यासाठी आवर्जून आमंत्रित करावे, तसेच तन-मन-धनाने सहकार्य करून या मंगलमय प्रसंगाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन जोगवा समिती व समस्त सेवेकरी, मुदखेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भावंडांमधील नात्यांच्या अनेक रंगांच्या छटा

पुणे : (स. गांवकरी)



भावंडांमधील नाते हे काळाच्या पलीकडचे असते. त्यात प्रेम, थोडीफार स्पर्धा, एकमेकांबद्दलची काळजी आणि काहीही न बोलताही समजून घेण्याची भावना असते. या सिब्लिंग्स डे निमित्त झी टीव्ही आपल्या काही खास मालिकांमधील भावंडांच्या नात्यांवर प्रकाश टाकत आहे. ही नाती देशभरातील प्रेक्षकांच्या मनाला आजही भिडतात. एकमेकांना कायम साथ देणे असो किंवा भावनिक चढ-उतारांनी भरलेला प्रवास, ही पात्रे आपल्याला आठवण करून देतात की भावंडे हे आपले पहिले दोस्त आणि आयुष्यातील सर्वांत मजबूत साथ देणारी ताकद असतात.

'गंगा माई की बेटियाँ' या मालिकेतील बहिणी आयुष्यातील आव्हानांना एकत्र सामोरे जाताना आणि सामाजिक अडथळ्यांपुढेही खंबीरपणे उभ्या राहताना जिद्द, त्यांच्यातील एकजूटपणा आणि एकमेकींसाठीचे न डगमगणारे समर्थन अतिशय सुंदर पद्धतीने रेखाटतात. झी टीव्हीच्या 'गंगा माई की बेटियाँ' या मालिकेत स्नेहा साकारणारी अभिनेत्री अमनदीप सिधू म्हणाली, "आमच्या कथेचे खरे सौंदर्य हे या बहिणी एकमेकींची ताकद कशा बनतात यात आहे. त्या केवळ एका घरात राहत नाहीत, तर धैर्य, त्याग आणि अतूट भावनिक नातेही शेअर करतात. यामुळे मला नेहमी जाणवते की आयुष्यातील सगळ्यात कठीण काळात भावंडेच आपला खरा आधार असतात. गंगा माईच्या सगळ्या बेटियाँमध्ये पडद्यावर आणि पडद्यामागेही एक अतिशय घट्ट नाते आहे आणि आम्ही प्रत्येक जण त्याची मनापासून कदर करतो."

झी टीव्हीच्या 'लक्ष्मी निवास' या मालिकेतील भावंडे पारंपरिक कुटुंबव्यवस्थेतील एकजुटीचे सुंदर चित्र उभे करतात. मतभेद आणि वाद असतानाही त्यांचे नाते दृढ संस्कारांवर आणि निष्ठेवर उभे आहे आणि त्यामुळे संपूर्ण कुटुंब एकत्र आहे. झी टीव्हीच्या लक्ष्मी निवास या मालिकेत राधिकाची भूमिका साकारणारी अभिनेत्री अक्षिता मुद्गल म्हणाली, ""लक्ष्मी निवास'मधील भावंडांचे नाते खास आहे कारण ते अगदी खरे वाटते. आम्ही भांडतो, मतभेद होतात, पण दिवसाअखेरीस एकमेकांबद्दल अपार प्रेम आणि जबाबदारीची भावना असते. यामुळेच हे नाते खरे वाटते. संयुक्त कुटुंबात भावंडे घराचा आधारस्तंभ असतात हे यातून प्रकर्षाने जाणवते0. सुख-दुःखात एकमेकांसोबत उभे राहणे किती महत्त्वाचे आहे याची जाणीव होते. पडद्यावरची भावंडेही हळूहळू प्रत्यक्ष आयुष्यात आपल्या कुटुंबाचा भाग होतात असेच वाटायला लागते."

'जगद्धात्री' या मालिकेत बहिणींचे नाते संघर्ष, मौन आणि मनातील अबोल भावना यांच्या स्तरांमधून उलगडताना दिसते. वादामागे दडलेले प्रेम आणि अडचणींच्या क्षणी एकमेकींसाठी खंबीरपणे उभी राहणारी ही नाती, खऱ्या अर्थाने भावंडपणाची ओळख करून देतात. शांतपणे दाखवलेले धैर्य आणि जिद्द या नात्यांना अधिक मजबूत बनवते. झी टीव्हीच्या 'जगद्धात्री' या मालिकेत मुख्य भूमिका साकारणारी अभिनेत्री सोनाक्षी बत्रा म्हणाली, "भावंडांचे नाते हे नि:स्वार्थ प्रेमाचे सर्वांत शुद्ध रूप असते. सुरुवातीला हे नाते जुळवताना अनेकदा अडचणी येतात, पण हळूहळू ते आपोआप आकार घेते आणि अतिशय घट्ट होते. आमच्या मालिकेत जगद्धात्री आणि तपस्या यांचे नाते असंच गोड-तिखट आहे. तपस्याच्या बाजूने ते थोडे कडू वाटते, तर जगद्धात्रीकडून ते पूर्णपणे प्रेमळ आहे. प्रत्यक्ष आयुष्यात मला मोठी बहीण असल्यामुळे मोठ्या भावंडांच्या भावना मला चांगल्या प्रकारे समजतात. लहान भावंडांकडे ते अनेकदा स्वतःच्या पहिल्या मुलासारखे पाहतात. मी माझ्या बहिणीला प्रेमाने 'छोटी माँ' म्हणते कारण तिने नेहमीच माझी खूप काळजी घेतली आहे आणि माझ्यासाठी सर्वोत्तमच हवे अशीच तिची इच्छा असते. हीच माया आणि जपणूक जगद्धात्रीच्या स्वभावातही दिसते. तपस्याला अजूनही हे पूर्णपणे कळलेले नसले तरी जगद्धात्री तिच्यासोबत कायम उभी राहील, तिचे रक्षण करेल आणि तिला नेहमी सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करेल."

'वसुधा' या मालिकेत भावंडांमधील बंध अतिशय शांत पण भक्कम ताकदीसारखा दिसून येतो. न बोलता केलेले त्याग, एकत्र उचललेली जबाबदारी आणि नि:स्वार्थ प्रेम यांमधून उलगडणारे हे नाते प्रत्येक संकटात ठामपणे उभे राहते. झी टीव्हीच्या 'वसुधा' या मालिकेत देवची भूमिका साकारणारा अभिनेता अभिषेक शर्मा म्हणाला, "भावंडांचे नाते नेहमी योग्य शब्द बोलण्यावर अवलंबून नसते, अनेकदा ते फक्त सोबत असण्यात असते. आमची पात्रे चढ-उतारातून जातात, पण भावंडांमधील तो शांत समजूतदारपणाच हे नाते इतके मजबूत बनवते.

## उन्हाची काळजी घ्या; उन्हाबाहेर पडणे टाळा - डॉ. वर्षा येमेकर

मुदखेड : (स. गांवकरी)

उन्हाळ्यामध्ये कडक उन्हामध्ये काही काळ फिरल्यावर त्वचेचा दाह होऊन पुरळ येते, द्रव पदार्थाने भरलेले छोटे वेदनादायी फोड येतात, स्वर्श केल्यावर त्वचा गरम लागते आणि क्वचित प्रसंगी ताप, मळमळ होऊन उलट्या सुरू होतात. या सर्व लक्षणांनाच सनबर्नस् असे म्हणतात आणि याच लक्षणांमुळे जिल्ह्यातील नागरिक सध्या हैराण झाले आहेत. खासगी रुग्णालयासह शासकीय रुग्णालय देखील रुग्णांनी भरुन गेल्याचे दिसून येत आहे. नांदेड जिल्ह्याचे तापमान सध्या ४० अंशापार गेले आहे. मागील आठ दिवसापासून ३८ ते ४२ दरम्यान सरासरी तापमान राहात आहे. याचा परिणाम आरोग्यावर होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे चक्कर येणे, डीहॅड्रेशन, गार पाणी पिल्याने घसा कोरडा होणे, जुलाब, ताप येणे, उष्माघात, उन्हाळी, घोळणा फुटणे, घामोळ्या येणे, त्वचा काळी पडणे, उष्णतेचे विकार, गळू होणे अशा विविध समस्या नागरिकांमध्ये उद्भवताना दिसत आहेत. लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्वांनाच उन्हाचा त्रास होतो. मात्र त्यापासून दूर राहिल्यास तसेच वेळीच काळजी घेतल्या आरोग्याला होणारी हानी टाळता येऊ शकते. उन्हाळ्याच्या दिवसात शरीर थंड राहील, याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे. तसेच शरीराचा थेट संबंध उन्हाशी येऊ न देता सर्वसाधारण वातावरणामध्ये राहणे अधिक फायद्याचे असते. जिल्ह्यात मागील दोन दिवसापासून सरासरी तापमान 38 अंशावर राहात आहे. दुपारी कडाक्याच्या उन्हामुळे रस्ते निर्मनुष्य दिसून येत आहेत. दुपारच्यावेळी कडाक्याचे उन असते. त्यामुळे शक्यतो दुपारी १ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे टाळले पाहिजे. त्यामुळे उष्णतेचा फटका बसणार नाही.

## यात्रेत भाविकांकडून भंडार व खोबऱ्याची उधळण

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

"सदानंदाचा येळकोट, भैरवनाथाचे चांगभलच्या गजरात भंडारा व खोबऱ्याची मुक्त उधळण करीत उदापुर ता:-जुन्नर येथे भरलेल्या ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ आणि ग्रामदेवता मुक्तदेवीच्या यात्रेत फिरविण्यात येणाऱ्या गाडीबगाडाचा थरार पहाण्यास हजारो भाविकांनी गर्दी केली, मात्र माध्यमिक शाळेत वार्षिक परीक्षा सुरू आणि चैत्र महिन्या तील उन्हाचा तडाखा यामुळे गर्दी कमी होती.अशी माहिती ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष संजीव शिंदे व उपाध्यक्ष रोहिदास शिंदे यांनी दिली.

या अतिप्राचीन मंदिरातील देवतांच्या यात्रेबाबत कमिटी सदस्य मोहन वल्हणकर, श्रीराम देवस्थान ट्रस्टचे खजिनदार किशोर होनराव व सरपंच सचिन आंबडेकर यांनी सांगितले की"चैत्र वद्यकालाष्टमी निमित्ताने उदापुर येथील यात्रेत फिरविण्यात येणारे गाडीबगाड संपूर्ण राज्यात प्रसिद्ध असून हनुमान



जन्मोत्सवच्या दिवशी आठवडाभर अगोदर बगाडाची लाकडे व अंबाडीचे नाडे पुष्पावती नदीपात्रात भिजत टाकले जातात यात्रेच्या दिवशी विविध पारंपरिक धार्मिक विधी यामध्ये पहाटे पाच वाजता श्रीं चा अभिषेक व महाआरती, मांडव-डहाळे,प्रतिमा मिरवणूक व शेरणी वाटप त्यानंतर दुपारी तीन वाजता गाडीबगाड फिरविण्यातील थरार सुरू झाला युद्धातील रथावर २१ फुटाचा उभा सुळका उभा करून त्याला ३१ फूट लांबीचा एक दंडगोलाकार आढे जोडला जातो.

ही सर्व आवळण्यासाठी अंबाडीची नाडे परंपरागत पद्धतीने तयार करण्याची कला थोरले शिंदे पाटील घराण्याकडे आहे. अढ्याच्या एक टोकाला टांगलेल्या झोक्यावर देव(भगत) बसतो तर दुसऱ्या टोकाला बांधलेल्या दोरीच्या साह्याने भाविक जथे पद्धतीने बगाड फिरवितात.

या वर्षी शुक्रवार दि:-१० एप्रिल रोजी युद्धरुपी रथाला पुढे मानाची एकनाथ शिंदे यांची चार बैलांची जुंपून करून दुपारी तीन वाजता हनुमान मंदिर परिसरातुन ही मिरवणूक निघते.उदापुर गाव च्या मुख्य चौकात ही मिरवणूक खरा जल्लोष निर्माण करते. उदापुर गावच्या परंपरेनुसार प्रत्येकाला बगाड फिरविण्याची संधी मिळावी यासाठी गावातील प्रत्येक समाजाच्या जथ्यासाठी दहा मिनिटांचा वेळ दिला जातो. यात पाहुणे मंडळींना प्रथम मान दिला जातो. सायंकाळी साडे सहा वाजता बगाड गावापासून पुष्पावती नदीपल्याड भैरवनाथ मंदिरा जवळ पोहचले भगत यांनी बगडाची व देवाची आरती केल्यानंतर असंख्य भाविकांनी खंडोबाचा जागर करीत तळी भंडार व आरती केली. मंदिराच्या सज्जात जाऊन प्रसाद म्हणून खोबऱ्याची मुक्त उधळण केली. सायंकाळी छबिना व पालखी मिरवणूक मोठ्या उत्साहात केली याचे नियोजन आडणी- कबाडी मंडळाकडून होते.

## iQOO ऑफर्ससह आपला सहा वर्षांचा प्रवास साजरा करत आहे

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

उच्च-कार्यक्षमतेचा स्मार्टफोन ब्रँड iQOO आपला सहावा वर्धापनदिन एका मर्यादित कालावधीच्या वर्धापनदिन सेलसह साजरा करत आहे. ६ एप्रिल ते १० एप्रिल, २०२६ पर्यंत, ग्राहक Amazon.in आणि iQOO.in वर iQOO स्मार्टफोन्सवर आकर्षक ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात.




गेल्या सहा वर्षांपासून, iQOO भारतातील तरुण आणि तंत्रज्ञान-प्रेमी ग्राहकांना शक्तिशाली आणि कार्यक्षमतेवर आधारित नवनवीन उत्पादने देण्यास वचनबद्ध आहे. या प्रवासाच्या केंद्रस्थानी ७० लाखांहून अधिक 'क्वेस्टर्स'चा एक मजबूत समुदाय आहे, ज्यांच्या अभिप्रायामुळे उत्पादने सुधारण्यास आणि विश्वास निर्माण करण्यास मदत होते. ग्राहक iQOO ई-स्टोअर आणि Amazon.in वर या ॲनिव्हर्सरी ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात. ६ वर्षांच्या ॲनिव्हर्सरी सेल दरम्यान ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स उपलब्ध आहेत: हा प्रीमियम फ्लॅगशिप तीन आकर्षक रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध होईल. मॅट ब्लॅक अल्फा एडिशन, टाइमलेस व्हाइट लेजेंड एडिशन आणि नवीन पॉवरपॅक्ड एपेक्स एडिशन. हे एडिशन एका टियर लीडरच्या संकल्पनेतून प्रेरित आहे, ज्याचे कलर फिलॉसॉफी वर्चस्व, दृश्यमानता आणि सर्वोच्च स्थान दर्शवते. हा स्मार्टफोन ७ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजल्यापासून Amazon.in, iQOO.in, रिलायन्स डिजिटल स्टोअर्स आणि निवडक Vivo स्टोअर्सवर उपलब्ध होईल. नुकताच लाँच झालेला iQOO Z11x हा त्याच्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोन आहे, जो MediaTek Dimensity 7400-Turbo प्रोसेसरवर चालतो आणि त्याने १० लाखांपेक्षा जास्त AnTuTu बेंचमार्क स्कोअर मिळवला आहे.

या स्मार्टफोनमध्ये त्याच्या सेगमेंटमधील सर्वात मोठी ७२००mAh बॅटरी आहे, जी ४४W फ्लॅशचार्जसह येते आणि ६ वर्षांपर्यंत बॅटरी हेल्थ सपोर्ट देते. यात IP68 आणि IP69+ डस्ट आणि वॉटर रेझिस्टन्ससह मिलिटरी-ग्रेड टिकाऊपणा आहे, आणि समोरच्या व मागच्या दोन्ही कॅमेऱ्यांमधून 4K व्हिडिओ रेकॉर्डिंगसह ५०MP सोनी AI-पॉवर्ड मुख्य कॅमेरा आहे. OriginOS 6 वर चालणारा iQOO Z11x, AI फीचर्सना सपोर्ट करतो, सोबतच त्याला २ वर्षांचे OS अपडेट्स आणि ४ वर्षांचे सिक्युरिटी अपडेट्स मिळतात. प्रिझमॅटिक ग्रीन आणि टायटन ब्लॅक या दोन आकर्षक रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध असलेला हा फोन, विशेषतः अशा विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केला आहे जे शिक्षण, मनोरंजन आणि आपले ध्येय यांच्यात संतुलन साधतात iQOO Z10 हा एक गेम-चेंजिंग स्मार्टफोन आहे, ज्यामध्ये 0.789cm च्या अतिशय स्लिम बॉडीमध्ये 7300mAh ची बॅटरी असून तो 90W फ्लॅशचार्जला सपोर्ट करतो. यात 120Hz रिफ्रेश रेट आणि 5000 nits लोकल पीक ब्राइटनेस असलेला 6.77-इंचाचा क्वाड-कर्व्ह AMOLED डिस्प्ले आहे, जो एक इमर्सिव्ह व्ह्यूइंग अनुभव देतो.

## सॅमसंग गॅलेक्सी A57 व A37 स्मार्टफोनची विक्री सुरू

गुरुग्राम : (स. गांवकरी)



Samsung ने आपल्या नव्या गॅलेक्सी A57 आणि गॅलेक्सी A37 स्मार्टफोन मालिकेची विक्री सुरू केली आहे. आकर्षक कॅशबॅक, अपग्रेड बोनस आणि सुलभ हप्ते योजनांसह हे स्मार्टफोन ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आले असून, विशेषतः तरुण वापरकर्त्यांना लक्षात घेऊन ही मालिका सादर करण्यात आली आहे. या स्मार्टफोनमध्ये ५० मेगापिक्सेल मुख्य कॅमेरा, कमी प्रकाशातही स्पष्ट छायाचित्रे घेण्यासाठी सुधारित प्रतिमा प्रक्रिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित संपादन साधने देण्यात आली आहेत. तसेच अल्ट्रा-वाइड आणि मॅक्रो लेन्ससह फ्रंट कॅमेराही उच्च दर्जाचा असून, छायाचित्रण आणि व्हिडिओसाठी हे फोन उपयुक्त ठरतात. दैनंदिन वापर अधिक सोपा करण्यासाठी शोध, संवाद आणि संपादनासाठी विविध स्मार्ट वैशिष्ट्येही समाविष्ट करण्यात आली आहेत. दोन्ही स्मार्टफोनमध्ये मजबूत रचना, पाणी व धूळ प्रतिरोधक क्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी ५००० एमएएच बॅटरी देण्यात आली आहे. जलद चार्जिंग सुविधेमुळे फोन कमी वेळात चार्ज होतो. याशिवाय सुधारित कार्यक्षमता देणारे आधुनिक प्रोसेसर आणि दीर्घकालीन सॉफ्टवेअर अद्ययावत सुविधा यामुळे या उपकरणांची उपयुक्तता वाढली आहे. ग्राहकांना 'ट्रिपल झीरो' योजनेअंतर्गत शून्य डाऊन पेमेंट, शून्य व्याजदर आणि सुलभ हप्त्यांमध्ये खरेदीची सुविधा देण्यात आली आहे. तसेच बँक व्यवहारांवर कॅशबॅक आणि अपग्रेड बोनसच्या ऑफर्समुळे हे स्मार्टफोन बाजारात अधिक आकर्षक पर्याय ठरत आहेत.

# फिनेस्टाचा महाराष्ट्रात विस्तार : सांगलीत ४० वे शोरूम सुरु

सांगली : (स. गांवकरी)

फिनेस्टा , भारतातील खिडक्या आणि दरवाजे बनविणाऱ्या कंपनीने आपल्या ब्रॅन्डचा विस्तार करत असताना महाराष्ट्रातील सांगली येथे पहिली शोरूम सुरू केली आहे. या शोरूम सोबत फिनेस्टाने महाराष्ट्रात एकूण ४० शोरूम चा टप्पा गाठला आहे. सांगलीमधील वाढत्या व्यवसायिक आणि निवासी बाजारपेठेची मागणी पूर्ण केली जाणार आहे.

सांगली शोरूमचा माध्यमाने ग्राहकांना फिनेस्टाचा सम्पूर्ण खिडक्या आणि दरवाजांकरीता असलेल्या उपाययोजना बघायला मिळतील, ज्यामध्ये uPVC आणि ॲल्युमिनियम खिडक्या आणि दरवाजे, तसेच सॉलिड पॅनल डोअर आणि फ़ॅसेड्सचा समावेश असेल.



या शोरूममध्ये येणाऱ्या ग्राहकांना उत्पादनांची कार्यक्षमता, रचना पद्धती आणि कस्टमाइज्ड पर्याय समजून घेता येऊ शकतील ज्यामुळे घर मालकांना, आर्किटेक्ट आणि डेव्हलपर्सला आपल्या रचना आणि उत्तम परिणामकारकतेकरीता योग्य त्या पर्यायांची निवड करता येऊ शकेल. या उद्घाटनाचा वेळी बोलताना, श्री. साकेत जैन, बिझनेस हेड, फिनेस्टा म्हणाले, " महाराष्ट्र हे फिनेस्टाकरीता एक महत्वाची विकास बाजारपेठ आहे कारण येथे नव्या शहरांमधून प्रिमियम खिडक्या आणि दरवाज्यांची भरपूर मागणी असते.

आमचा सांगलीमधील पहिल्या श्रीरामचंद्र ट्रेडर्ससह केलेल्या या भागीदारीमुळे या क्षेत्रात आमचे स्थान बळकट करण्यावर आमचा भर असेल आणि आमचा अस्तित्वामुळे आम्ही ग्राहक तसेच उद्योगातील स्टेक होल्डर्सला अधिक चांगल्या पद्धतीने सहाय्य करू शकू. या शोरूममुळे ग्राहकांना फिनेस्टाने निर्माण केलेल्या उपाययोजना प्रत्यक्षपणे बघता येऊ शकतील आणि आपल्या निवासी तसेच व्यावसायिक जागांकरीता उत्तम पर्याय निवडून माहितीपूर्ण निर्णय घेता येऊ शकेल."

**फिनेस्टाचे नेटवर्क आज ४०० डिलर्सचा माध्यमाने भारतभर पसरलेले असून आंतरराष्ट्रीय स्तरावर नेपाळ, भूतान, मालदिव्ज, श्रीलंका, घाना आणि केनिया येथे देखील विस्तारलेले आहे. कल्पकता, गुणवत्ता आणि शाश्वत उपायोजनांवर आपले लक्ष केंद्रित करत, फिनेस्टा आपला फ़ेनेस्ट्रेशन अनुभव अधिक चांगला बनविण्यास बांधिल आहे. यासह लुधियानामधील शोरूमचा उद्घाटनामुळे फिनेस्टाचा भारतातील खिडक्या,दरवाज्यांचा ग्राहकांचा अनुभव अधिक विस्तारीत करण्याकरीताच उचललेले गेलेले आणखीन एक पाऊल आहे.**

## थोडक्यात पण महत्वाचे



### वसुंधरा अकॅडमीला राष्ट्रीय स्तरावरील शिक्षा अवार्ड पुरस्कार प्राप्त

अकोले (स. गांवकरी) : अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडमीला शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी सातत्यपूर्ण वचनबद्धतेबद्दल राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार LEAD Group चे CEO व सह-संस्थापक सुमीत मेहता आणि नॅशनल हेड मोहित सूरी यांच्या हस्ते पुणे येथे प्रदान करण्यात आला. प्रोपेलचे झोनल डायरेक्ट विशाल उधानी व अंकिता वृंदावन यांनी रस्मार्ट क्लासरूम्स, टीव्ही, टॅब च्या साह्याने ॲक्टिव्हिटी बेस्ड अध्ययन अध्यापन, लर्निंग लेड कॉन्फरन्सेस, पेरेंट फीडबॅक सिस्टीम, प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीकडे सातत्यपूर्ण लक्ष या क्रायटेरियांच्या आधारे राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकासाठी वसुंधरा अकॅडमीची निवड केली. शाळेने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत उल्लेखनीय वाढ साध्य केली असून शिक्षक विकासावरही विशेष भर दिला आहे. वसुंधरा अकॅडेमी प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण देत सातत्याने नवे मानदंड प्रस्थापित करत आहे. संखेच्या व शाळेच्या वतीने संस्थेच्या कोषाध्यक्षा तथा वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री राजीव देशमुख व उपप्राचार्या राधिका विक्रम नवले यांनी या पुरस्काराचा स्वीकार केला. संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, सहसचिव प्राचार्या अल्फोन्सा डी व सर्व पालक वर्ग यांनी वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्य, उपप्राचार्य सर्व शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.



### कन्या विद्यालयात एआय प्रदर्शन उत्साहात संपन्न


श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपकरणांचे प्रदर्शन मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यालयातील एआय विभागामार्फत या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात मोठ्या संख्येने विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य कुंडलिकराव दरेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अश्विनी रणसिंग, डॉ. शुभांगी दरेकर, वर्षा ढवळे, आशा कुदळे, प्राचार्य दिलीपराव भुजबळ, शहाजी एकाड, मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे, गुरुकुलप्रमुख किरण शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयातील एआय विभाग प्रमुख भूषण साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. यामध्ये एआय तंत्रज्ञानावर आधारित थ्रीडी पेंटिंग, रोबोटिक्स, कोडिंग-डिकोडिंग, सेन्सर टेक्नॉलॉजी आदी विषयांवरील आकर्षक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. स्पर्धा सहावी ते सातवी आणि आठवी ते नववी अशा दोन गटांमध्ये घेण्यात आली होती. प्रत्येक गटातून प्रत्येकी तीन उत्कृष्ट उपकरणांची निवड करून विजेत्या विद्यार्थिनींना बक्षिसे देण्यात आली. या विद्यार्थिनींना गणेश फडताळे व कुंदन खामकर यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान, विद्यालयातील माजी विद्यार्थिनी अश्विनी हिरडे हिची पुणे ग्रामीण पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यालयातील सर्व विद्यार्थिनींनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

### महात्मा फुले द्विशताब्दी जयंती वर्षात त्यांचे साहित्य प्रकाशित करा

- उपमहापौर परशुराम वाडेकर यांची मागणी

पुणे (स. गांवकरी) : महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त देशभर व राज्यभर विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे केले जात आहेत. मात्र, या महत्त्वाच्या वर्षातही महात्मा फुले यांचे समग्र साहित्य शासनाच्या वतीने प्रकाशित झाले नसल्याची बाब समोर आली आहे. याबाबत तीव्र खंत व्यक्त करत पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. उद्या महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर शासकीय फोटो झिंको तसेच संबंधित शासकीय विभागांकडून महात्मा फुले यांच्या साहित्याची मागणी करण्यात आली असता, असे कोणतेही साहित्य उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली. यामुळे संताप व्यक्त करत वाडेकर यांनी संबंधित विभागाने तातडीने महात्मा फुले यांचे समग्र वाङ्मय तसेच त्यांच्याशी संबंधित सर्व साहित्य प्रकाशित करावे, अशी मागणी केली आहे. तसेच, राज्य शासनाच्या प्रकाशन विभागाचे प्रमुख या नात्याने मंत्री चंद्रकांत पाटील यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घालून सर्व साहित्य तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

### इकोलिंक बनले राजस्थान रॉयल्सचे असोसिएट स्पॉन्सर्स




पुणे (स. गांवकरी) : भारतात आता उर्जेने भरलेल्या टी २० मौसमाचे वारे सुरु झाले असतांनच, सिग्निफाय (युरोनेक्स्टः लाईट) या जगभरांतील आघाडीच्या लायटिंग कंपनी तर्फे आज त्यांचा उदयोन्मुख ब्रॅन्ड असलेल्या युरोलिंक ने राजस्थन रॉयल्स बरोबरच्या भागीदारीची घोषणा करण्यात आली. या भागीदारी मुळे युरोलिंक हा टिमचा असोसिएट स्पॉन्सर बनला असून यामुळे ब्रॅन्डचे अस्तित्व हे भारतातील सर्वांत मोठ्या खेळाच्या मंचा बरोबर जोडले जाऊन त्याच बरोबर देशभरांतील कोट्यावधी अशा क्रिकेट फॅन्स बरोबर जोडले जाणार आहे. या भागीदारी मुळे इकोलिंकच्या आगामी उत्पादनश्रेणीचा ही प्रसार होणार असून यामुळे ब्रॅन्डचे भारतीय ग्राहकांना कार्यक्षम आणि विश्वसनीय उत्पादने देण्याचे वचन अधोरेखित होणार आहे. ज्या प्रमाणे राजस्थान रॉयल्स त्यांच्या क्षेत्रात सर्वोत्तम देत असते त्या प्रमाणे इकोलिंक सुध्दा आरामदायकता आणि सोपेपणा हा देशभरांतील कोट्यावधी घरांना देत असते. या भागीदारीचा एक भाग म्हणून ब्रॅन्ड हा शिरस्त्राणांवर महत्त्वपूर्ण ठिकाणी झळकण्यासह त्यांच्या महत्त्वपूर्ण अशा प्रसार मोहिमांसह डिजिटल उपक्रमांमध्ये संपूर्ण स्पर्धे दरम्यान दिसणार आहे.

# मॅटकेअर पुणेतर्फे ‘जननी आरोग्य शिबिरा’चे उद्‌घाटन

## महिला आरोग्य व प्रसूतीपूर्व सेवांपर्यंत पोहोच वाढवणे हा उद्देश

पुणे : (स. गांवकरी)



मॅटकेअर मॅटर्निटी अँड चाइल्ड हॉस्पिटलच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त, मॅटकेअर पुणेतर्फे सिम्बायोसिस ऑडिटोरियम, क्लोव्हर पार्क, विमान नगर, पुणे येथे ‘जननी आरोग्य शिबिरा’चे उद्‌घाटन करण्यात आले आहे. ही उपक्रमणा पुणे ओबीजिवाय सोसायटी, एनएमओ तसेच रोटरी क्लब यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असून, पुण्यातील महिला आणि गर्भवती मातांसाठी वेळेवर, तज्ज्ञ व विशेष उपचारांची उपलब्धता वाढवण्याच्या मॅटकेअरच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे हे द्योतक आहे. यापैकी एक आरोग्य शिबिर मॅटकेअर पुणे, कॉमन विंग बी, क्रमांक 232, एच नंबर 1-2, आनंद एमरल्ड एसआर, विमान नगर रोड, पुणे, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन भारत सरकारचे केंद्रीय कॅबिनेट मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी ANC हँडबुकचे प्रकाशन केले तसेच पुणे आणि परिसरातील भागांमध्ये आयोजित होणाऱ्या 100 प्रसूतीपूर्व शिबिरांच्या नेटवर्कचा औपचारिक शुभारंभ केला. याप्रसंगी इंदिरा आयव्हीएफचे मॅनेजिंग डायरेक्टर नितिज मुर्डिया, मॅटकेअरचे वरिष्ठ प्रतिनिधी — मॅटकेअरचे सीईओ डॉ. निखिल यादव, मॅटकेअर पुणे येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रविण ठोकळ, मॅटकेअरच्या नॅशनल निओनॅटल हेड डॉ. वृशाली बिचकर, मॅटकेअरचे मेडिकल सुपरिंटेंडेंट व इंदिरा आयव्हीएफचे झोनल बिझनेस डायरेक्टर डॉ. अमोल लुण्कड़, तसेच मॅटकेअरच्या फॅसिलिटी डायरेक्टर डॉ. इशिता लुण्कड़ उपस्थित होते. ‘जननी आरोग्य शिबिरा’च्या माध्यमातून पुण्यात एका दिवसात 100 प्रसूतीपूर्व शिबिरांद्वारे महिलांपर्यंत आणि समुदायापर्यंत मोफत प्रसूतीपूर्व तपासणी व महिला आरोग्य सल्ला पोहोचवण्यात येणार आहे. त्याचबरोबर ANC हँडबुकच्या माध्यमातून गर्भवती मातांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन मिळणार आहे. या सर्वसमावेशक उपक्रमाद्वारे मॅटकेअर पुणे येथे मातृत्व आरोग्याबाबत जनजागृती वाढवणे, प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन देणे तसेच वेळेवर निदानाला चालना देणे, असा उद्देश ठेवण्यात आला आहे. केंद्रीय कॅबिनेट मंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले की, 100 प्रसूतीपूर्व शिबिरे आणि ANC हँडबुकसह जननी आरोग्य शिबिराची सुरुवात ही मातृ आरोग्यसेवांच्या पुरवठ्यातील एक परिवर्तनकारी पाऊल आहे. सार्वजनिक–खाजगी भागीदारीद्वारे अत्यावश्यक आरोग्य सेवा कशा प्रकारे समुदाय पातळीपर्यंत पोहोचवता येतात, याचे हे उत्तम उदाहरण असून, यामुळे भारतातील मातृ आरोग्य पायाभूत सुविधा अधिक मजबूत होतील. इंदिरा आयव्हीएफचे मॅनेजिंग डायरेक्टर नितिज मुर्डिया यांनी नमूद केले की, मॅटकेअरच्या पहिल्या वर्धापनदिनाला ‘जननी आरोग्य शिबिरा’ची जोड मिळाल्याने हा प्रसंग अधिक खास ठरला आहे. आवश्यकतेच्या ठिकाणीच सेवा पोहोचवणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. पुणे आणि परिसरातील भागांमध्ये एका दिवसात सेवा पोहोचवून, प्रसूतीपूर्व काळजी अधिक सुलभ, वेळेवर आणि कुटुंबांसाठी आवश्यकतेनुसार सहज उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

## पीक डेंटल हेल्थ सुरु ठेवण्यासाठी प्लॉट उपक्रमाची सुरुवात

पुणे : (स. गांवकरी)



मौखिक आरोग्य आणि आरोग्या विषयीची आपली वचनबध्दता वाढवत कोलगेट टोटल तर्फे आज मुंबई इंडियन्स बरोबर त्यांचा डेंटल परफॉर्मन्स पार्टनर म्हणून भागीदारी केल्याची घोषणा केली असून यामुळे २०२६ च्या मौसमापूर्वी मौखिक आरोग्य हे खेळाडूंसाठी प्राथमिक असल्याचे अधोरेखित केले. कोलगेट तर्फे प्लॉट (परफॉर्मन्स लिंक्ड ओरल टेस्ट) या सर्वसमावेशक हेल्थ स्क्रीनिंग फ्रेमवर्क ची सुरुवात करण्यात आली असून याचे डिझाईन हे खेळाडूंच्या दातांच्या आरोग्याची तपासणी आणि काळजी घेण्यासाठी करण्यात आले आहे. ही भागीदारी टीमच्या कार्यक्षमतेच्या फ्रेमवर्क मध्ये एकत्र होऊन खेळाडूंच्या मैदानातील तग धरण्याची क्षमता आणि त्यातून सावरण्यासाठी शारीरीक आरोग्य हा एक महत्त्वाची गोष्ट आहे हे ओळखून करण्यात आली आहे. तोंड हे शरीराचे प्रवेशद्वार आहे. वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे असे दिसून येते की जंतू हे तुमच्या शरीरात तोंडावाटे प्रवेश करु शकतात ज्यामुळे सूज येऊन बरे होण्याची प्रक्रिया लांबते त्यामुळे खेळाडूची कार्यक्षमताही कमी होते. म्हणूनच मैदानात ज्यावेळी सर्वोत्कृष्ट कार्यक्षमतेची गरज असते अशा वेळी तोंडातील जंतूंची निर्मिती रोखणे महत्त्वाचे असते. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आघाडीची क्लिनिशियन डॉ. मोएझ खाकियानी हे मुंबई इंडियन्सच्या लोकांच्या दातांची तपासणी ही अत्याधुनिक अशा इंट्राओरल स्कॅनिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यासह डब्ल्यूएचओ वर आधारीत मौखिक तपासण्या.

## डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या नेत्ररुग्णालयाचे उद्‌घाटन

मोशी : (स. गांवकरी)



महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज मोशी येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्‌घाटन केले. पुणे महानगर परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे. उद्‌घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल. या केंद्राचे उद्‌घाटन पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर श्री. नितीन काळजे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ४,२०० चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (LASIK), कॉर्निया, ग्लॉकोमा, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार परिणाम सुनिश्चित केले जातील.

डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) यांनी सांगितले, “डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलमध्ये आमचा मुख्य भर प्रगत नेत्रसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यावर आणि उच्च दर्जाची वैद्यकीय गुणवत्ता राखण्यावर आहे. मोशी केंद्र हे या वेगाने विकसित होणाऱ्या भागातील रुग्णांपर्यंत विशेष सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे.”

श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) म्हणाले,“आम्ही रुग्णकेंद्रित सुविधा उभारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, ज्या मजबूत क्लिनिकल प्रणाली आणि उत्कृष्ट व्यवस्थापनावर आधारित आहेत. हे केंद्र उच्च दर्जाचे उपचार परिणाम आणि उत्कृष्ट रुग्ण अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे.”

## जॉनसन अँड जॉनसनने भारतात नवीन टेक्निस नेक्स्ट-जनरेशन ओडिसी हे अत्याधुनिक इंट्राऑक्युलर लेन्स लॉन्च केले

पुणे : (स. गांवकरी)




जॉनसन अँड जॉनसन ने आज जाहीर केले की त्यांनी भारतात टेक्निस ओडिसी आयओएल, लॉन्च करून त्यांच्या प्रेस्बायोपिया-करेक्टिंग इंट्राओक्युलर लेन्स (पीसी-आयओएल) च्या श्रेणीचा विस्तार केला आहे. ही नवीन फुल व्हिज्युअल रेंज आयओएल उच्च दर्जाची आणि सलग स्पष्ट दृष्टी प्रदान करते, यामुळे रुग्णांना दूर, जवळ आणि मधल्या सर्व अंतरांवर स्पष्ट दिसू शकते आणि चष्म्याची गरज कमी होते. उद्योगात आघाडीवर असलेल्या टेक्निस प्लॅटफॉर्मवर आधारित, प्रगत ऑप्टिक्स आणि विशेष साहित्य वापरून तयार केलेला टेक्निस ओडिसी आयओएल, सातत्यपूर्ण, स्पष्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट असलेली दृष्टी प्रदान करते. यामुळे 93 % रुग्णांना चष्म्यापासून मुक्ती मिळते आणि सर्व अंतरांवर स्पष्ट दृष्टी प्राप्त होते.“टेक्निस ओडिसी आयओएल, मोतीबिंदूच्या रुग्णांसाठी, चष्म्यावर कमी अवलंबून राहण्याची गरज पूर्ण करण्यास मदत करतो. + भारतामध्ये याची सुरुवात झाल्यामुळे प्रगत आयओएल तंत्रज्ञान अधिक लोकांपर्यंत पोहोचेल, जे सर्व अंतरांवर उच्च दर्जाची आणि सतत स्पष्ट दृष्टी देण्यासाठी तयार केलेले आहे. टेक्निस प्युअरसी सोबत मिळून, टेक्निस ओडिसी आयओएल, आमच्या आयओएल पोर्टफोलिओची ताकद आणि व्याप्ती वाढवते, ज्यामुळे आजच्या वाढत्या वयाच्या लोकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यात आम्हाला मदत होते,” असे सर्जिकल व्हिजन इंडिया & साऊथ एशिया, जॉनसन अँड जॉनसन चे कंट्री मॅनेजर, बुरझिन शाहाना यांनी सांगितले.टेक्निस ओडिसी असे डिझाईन केलेले आहे की डॉक्टरांना अधिक आत्मविश्वासाने उपचार करता येतात, कारण त्यातील फ्रीफॉर्म डिफ्रॅक्टिव्ह प्रोफाइलमुळे उरलेल्या दृष्टीदोष/ रिफ्रॅक्टिव एरर अधिक चांगल्या प्रकारे सांभाळले जाते. 94% रुग्ण त्यांच्या एकूण दृष्टीबद्दल चष्म्याशिवाय समाधानी होते.फ्रीफॉर्म डिफ्रॅक्टिव्ह प्रोफाइलमुळे त्रासदायक प्रकाशाशी संबंधित दृष्टीतील अडचणी कमी प्रमाणात दिसतात. 93% रुग्णांनी कोणत्याही प्रकारच्या दृष्टीतील अडचणींची तक्रार केली नाहीटेक्निस ओडिसी कमी प्रकाशातही उत्कृष्ट कॉन्ट्रास्टसह स्पष्ट दृष्टी प्रदान करते. 92% रुग्णांना रात्री पायऱ्या आणि रस्त्याचे कड (कर्ब) स्पष्टपणे दिसण्याबाबत समाधान वाटले. फुल व्हिज्युअल रेंज देणारा टेक्निस ओडिसी आयओएल, आता भारतात उपलब्ध आहे.

## १ हजार अनुयायांना पुस्तक वाटप व मूकपटाचे ऐतिहासिक आयोजन

पुणे : (स. गांवकरी)





भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात यंदा एक अत्यंत क्रांतिकारी आणि वैचारिक उत्सव साजरा केला जाणार आहे. 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समिती'च्या आवाहनाला प्रतिसाद देत, भिमसेवा प्रतिष्ठान आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी गेली २५ वर्षे सुरू असलेली स्पीकरची (डीजे) परंपरा यंदा कायमची बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मिरवणुकीतील मोठ्या आवाजाचा मानवी आरोग्यावर होणारा घातक परिणाम लक्षात घेऊन आणि नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी घटनांपासून बोध घेत, यंदा स्पीकरवर होणारा अवाढव्य खर्च टाळून १,००० अनुयायांना महापुरुषांच्या विचारांची पुस्तके मोफत वाटली जाणार आहेत. "वाचाल तर वाचाल" हा बाबासाहेबांचा संदेश प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. यावर्षीच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे ३० फुटांचे तथागतांचे भव्य बुद्धरूप असलेला विशेष देखावा. तसेच, "गोंगाटात विचार हरवू नका" हा संदेश देण्यासाठी तथागत बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील 'तीन पात्री मूकपट' (Silent Play) आयोजित करण्यात आला आहे.

# रोबोटिक शस्त्रक्रिया आणि संरक्षण तंत्रज्ञानात भारताची मोठी झेप

## SMRSC 2026 मध्ये ‘प्रोजेक्ट विमाना’ आणि ‘प्रोजेक्ट ऑपेरियन’ लॉन्च

पुणे : (स. गांवकरी)



भारतात आयोजित तिसऱ्या ग्लोबल एसएसआय मल्टी-स्पेशालिटी रोबोटिक सर्जरी कॉन्फरन्स (SMRSC) २०२६ दरम्यान अत्याधुनिक वैद्यकीय आणि संरक्षण तंत्रज्ञानाची ऐतिहासिक झलक पाहायला मिळाली. या प्रसंगी एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल (SSII) ने दोन क्रांतिकारी तंत्रज्ञान — प्रोजेक्ट विमाना (Project Vimana) आणि प्रोजेक्ट ऑपेरियन (Project Operion) — सादर केले, जे भविष्यातील शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन वैद्यकीय व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरणार आहेत. तीन दिवस चाललेल्या या जागतिक परिषदेत जगभरातील १५०० पेक्षा अधिक डॉक्टर आणि २५० पेक्षा अधिक तज्ञ सहभागी झाले. परिषदेत रोबोटिक सर्जरी, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), टेली-सर्जरी आणि मोबाइल ऑपरेटिंग प्लॅटफॉर्म यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानांवर चर्चा झाली. या दरम्यान एसएसआय मंत्रा-३ आणि मंत्रा आसना यांच्या साहाय्याने १५ लाईव्ह टेली-सर्जरी आणि १४ लाईव्ह शस्त्रक्रियांचे यशस्वी प्रात्यक्षिक करण्यात आले. परिषदेचे उद्‌घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत झाले. या कार्यक्रमात डॉ. नरेश त्रेहान, डॉ. संगीता रेड्डी, डॉ. फ्रेडरिक मोल, श्री मधुसूदन साई आणि डॉ. मायलस्वामी अन्नादुरई यांसारखे देश-विदेशातील नामांकित तज्ञ उपस्थित होते. प्रोजेक्ट विमाना हे एक क्रांतिकारी युद्धभूमीवरील शस्त्रक्रिया प्रणाली आहे, जी उच्च क्षमतेच्या स्वायत्त ड्रोनद्वारे युद्धक्षेत्र किंवा आपत्कालीन ठिकाणी पोहोचवता येते. या प्रणालीमध्ये दोन अत्याधुनिक ७-डिग्री फ्रीडम असलेले मिनिएचर रोबोटिक आर्म्स आहेत, ज्यांच्या मदतीने दूर बसलेले ट्रॉमा सर्जन गंभीर जखमी सैनिकांवर शस्त्रक्रिया करू शकतात. ही तंत्रज्ञान रक्तस्त्राव नियंत्रण, छातीचे डीकंप्रेशन, शरीरात अडकलेले धातूचे तुकडे काढणे आणि जखम दुरुस्ती यांसारख्या जीव वाचवणाऱ्या उपचारांमध्ये सक्षम आहे.

परिषदेत प्रोजेक्ट ऑपेरियनही सादर करण्यात आला, जो पूर्णपणे मोबाइल आणि प्लॅटफॉर्म-अॅग्नॉस्टिक ऑपरेटिंग रूम सिस्टम आहे. हे हॉस्पिटल्स, दुर्गम भाग आणि आपत्तीग्रस्त क्षेत्रांमध्ये सहज तैनात करता येते. ओव्हरहेड-इंटिग्रेटेड रोबोटिक्स आणि झिरो-फुटप्रिंट आर्किटेक्चरने सुसज्ज असलेली ही प्रणाली डॉक्टरांना ३६० अंश प्रवेश, रिअल-टाइम कॉन्फिगरेशन आणि टेली-सर्जरीची सुविधा देते. यामुळे तज्ञ सर्जन दूरवरूनही रुग्णांवर शस्त्रक्रिया करू शकतात. परिषदेत एसएसआय काया ह्यूमनॉइड ॲप्लिकेशन्सही सादर करण्यात आले. हे रोबोट आरोग्य सेवा, संरक्षण, लॉजिस्टिक्स, आपत्ती व्यवस्थापन आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये मानवी क्षमतांना बळकटी देतील. हे रोबोट एआय, टेलीऑपरेशन आणि रिअल-टाइम सेन्सिंग तंत्रज्ञानाने सुसज्ज असून कठीण आणि धोकादायक परिस्थितीत काम करण्यास सक्षम आहेत. या प्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री श्री प्रतापराव जाधव म्हणाले,“भारत हळूहळू जागतिक मेडटेक आणि इनोव्हेशन लीडर म्हणून उदयास येत आहे आणि एसएस इनोव्हेशन्स सारख्या कंपन्या यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. प्रोजेक्ट विमाना, प्रोजेक्ट ऑपेरियन आणि एसएसआय काया सारखी तंत्रज्ञान ‘आत्मनिर्भर भारत’ला बळकटी देतात आणि भविष्यात आरोग्य सेवा अधिक सुलभ करण्यास मदत करतील.” एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष आणि सीईओ डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले,“एसएसआय मल्टी-स्पेशालिटी रोबोटिक सर्जरी कॉन्फरन्स (SMRSC) २०२६ हा आमच्या त्या मिशनकडे नेणारा महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामध्ये आम्ही जागतिक दर्जाच्या शस्त्रक्रिया सेवा अधिक सुलभ आणि परवडणाऱ्या बनवण्याचा प्रयत्न करत आहोत. प्रोजेक्ट विमाना आणि प्रोजेक्ट ऑपेरियन सारख्या तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रिया सेवा हॉस्पिटलच्या मर्यादांपलीकडे जाऊन युद्धभूमी, आपत्तीग्रस्त क्षेत्रे आणि दुर्गम भागांपर्यंत पोहोचू शकतील.”